

॥ सोपानदेवी ॥




श्री सोपानदेवी

हि प्रत सौ. मंजुश्री गोखले ह्यांनी संपादित केलेल्या पुस्तकाप्रमाणे श्री श्रीपाद काळे यांनी विनामूल्य वाचनासाठी टंकलिखित केली आणि ई साहित्य प्रतिष्ठानक्डे सुपूर्द केली. सौ. मंजुश्री गोखले ह्यांनी हे पुस्तक गुरुकुल प्रतिष्ठान, पुणे ह्यांच्या कडे संपादित केले आहे.

हे पुस्तक जास्तीत जास्त लोकांपर्यंत जावे यासाठी आपल्या सहकार्याची गरज आहे.

अधिक माहितीसाठी...

मञ्जुश्री गोखले : कोल्हापूर : ९८५००६०८३८

श्रीपाद काळे : पुणे : ९८६९४४७४३१

shripadykale@gmaaail.com

श्री सोपानदेवी

ई प्रकाशक :

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

ई प्रकाशन :१० मे २०१७

©esahity Pratishthan®2017

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# संत : सोपानदेव

संत निवृत्तीनाथ, संत ज्ञानेश्वर व संत मुक्ताई यांचेच चौथे बंधू संत सोपानदेव. अफाट ज्ञानसाधना व विठ्ठल भक्तीचा ठेवा असूनही भावंडांच्या लोकप्रियतेच्या प्रभावळीत सदैव झकोळलेल्या या ओजस्वी रचनाकारास भावपूर्ण श्रद्धांजली.

आळंदीच्या विठ्ठलपंत कुळकर्ण्यांचे सोपानदेव हे तिसरे अपत्य. सन्याशाची मुले म्हणून साऱ्या समाजाने केलेल्या हेटाळणीचा खोल परिणाम सोपानदेवांच्या बालमनावरही झाला होता. निवृत्तीनाथ व ज्ञानेश्वर आणि सोपान यांच्या वयात बरेच अंतर असल्याने आई-वडिलांच्या मृत्यूनंतर ते मोठ्या भावांच्या मायेतच वाढले.

निवृतीनाथांची नाथपंथीय शिकवणुकीची साधना चालूच होती. ज्ञानेश्वर तर प्रकाण्ड पंडित व तत्ववेत्ते. त्या दोघांबरोबर राहून सोपानदेवांनी नाथपंथ व गीता यांचा गहन अभ्यास केला.

ज्ञानेश्वर गीतेवर मराठीत टीका करत ज्ञानेश्वरी या ग्रंथाची निर्मिती करत होते, तेव्हा लिखाण व टिपणे काढण्याचे काम सोपानदेव करत होते, असे उल्लेख सापडतात. सोपानदेवांनी स्वत:ही अभंग, ओव्या रचल्या. त्यापैकी सुमारे ५० आज उपलब्ध आहेत.

गीतेवर गद्यरूपी भाष्य करणारा 'सोपानदेवी' हा ग्रंथ त्यांनी रचला. निवृतीनाथ, ज्ञानेश्वर, नामदेव, चोखा मेळा, गोरा कुंभार, जनाबाई, मुक्ताई अशा संतमेळयाने पदयात्रा केली, त्यात सोपानदेवही सामील होते.

संत ज्ञानेश्वरांनी १२९६मध्ये आळंदीला समाधी घेतल्याने सोपानदेव कमालीचे अस्वस्थ व विव्हल झाले. दोनच महिन्यांत त्यांनी सासवड येथे देह ठेवला. तिथे या अनोख्या विद्वान संताचे समाधी मंदिर आजही उभे आहे.

सोपानदेव यांचा हा अभंग प्रसिद्ध आहे.

आवडीचें मागे प्रवृत्तीचे नेघें ।

नाममार्गे वळगे निघे राया ।।

नाम परब्रह्म नाम परब्रह्म ।

नित्य रामनाम जपिजेसु ।।

अंतरींचिया सुखे बाहिरिलिया वेखें।

परब्रह्म मुखें जपतुसें ।।

सोपान निवांत रामनाम मुखांत ।

नेणे दुजी मात हरिविण ।।

आज येथे ई साहित्य प्रतिष्ठानतर्फ़े संत सोपानदेवांनी लिहीलेला सोपानदेवी हा ग्रंथ सादर करीत आहोत.

ॐ

# अध्याय पहिला

## धृतराष्ट्र उवाच :

धृतराष्ट्र म्हणे संजया। धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे ठाया। कौरव पांडव मिळोनिया। तेथे काई करिताती।१।

## संजय उवाच :

संजय म्हणे रायासी | पांडव सैन्य दृढ देखिलें परियेसी | राजा दुर्योधन द्रोणापाशी | जाउनी सांगता जाला |२| द्रोणाचार्य हे पांडव सैन्य पाहे | द्रुपदपुत्रें रचना केली आहे | हा तुझा शिष्य होय | बुद्धी अधिकु |३|

पांडवसैन्यीं वीर जाण | युद्ध करणार भीमार्जुन | तया समान विराट आणि युयुधान | द्रौपदही महारथी |४| धृष्टकेतु चेकितान | काशिराजश्च वीर्यवान | पुरोजित अति तीक्ष्ण | कुंतिभोज सैन्य हे नराधिपती |५|

युधामन्यु पराक्रमी बहुत | उत्तमौजाश्च वीर्यवंत |सौभद्रो आणि द्रौपदीचे सुत | हे सर्वही महारथी |६|

आम्हांमध्यें जे वरिष्ठ | ते तूं ऐक द्विजा श्रेष्ठ | माझिया सैन्यांत जे सुभट | ते तुज जाणावया सांगेन मी |७|

तूं आणि भीष्म कर्ण। कृपाचार्य जयवंत संपूर्ण। अश्वत्थामा विकर्ण। सोमदत्ति श्रेष्ठ हे।८।

आणिकही बहुत वीर। माझे अर्थी प्राण त्यजावया निरंतर। नाना शस्त्रे प्रहरणार। सकळ कुशळ युद्धासी।९।

आमचे सैन्य असे गाढें। भीष्म देव रक्षितो प्रौढीने धडफुडें। त्यांचे सैन्य असे थोडें। भीम रक्षितो बळें करूनी।१०। तरी ठाईं ठाईं रणभूमिसी। जतन करावे भीष्मदेवासी। तो तुम्हां रक्षील समस्तांसी। यासी संदेह नाही।११। कुरुवंशी भीष्म प्रतापया। दुर्योधनासी सुख उपजावया। सिंहनाद करूनिया। शंख वाजविला तेणें।१२।

शंख आणि भेरी। अवघी वाजविली येकसरी। पणव गवानखें मुखे घेउनी करीं। थोर नाद होता जाला।१३।

या नंतरे श्वेतबाहो महारथी | परी पांडव आणि श्रीपति | श्रीकृष्ण दिव्य शंख घेऊनिया हाती | वाजविते जाले |१४|

पांजजन्य घेतला श्रीकृष्णें | देवदत्त घेतला अर्जुनें | भीमकर्मा वृकोदर तेणे | पौंड्रिक शंख वाजविला |१५|

अनंत विजय गजरें थोरें | वाजविला रायें युधिष्ठिरें | नकुल सहदेव वीरें | सघोष मणिपुष्पक वाजविला |१६| काशिराज धनुर्धरु | शिखंडिया महावीरु | धृष्टद्युम्न विराट थोरु | सात्यकियां तो अपराजितु |१७|

द्रुपद आणि द्रौपदीचे सुत | सुभद्रेचा पुत्र महाबाहो विख्यात | अगा राया हे मिळोनि समस्त | शंख वेगळे जाले |१८|

तया नादाचेनि गजरें | दुमदुमिलीं मेरुशिखरें | दुर्योधना दु:ख जाले भरें | हृदय त्याचें विदारतसे |१९ |

नंतरे सिद्ध जाले कौरवभार । ते अवसरी कपिध्वज वीर । देखोनि शत्रूचा पडिभार। धनुष्य उचलिता जाला।२०।

**अर्जुन उवाच :**

अगा राया भूपति। ऐसे अर्जुन बोलिला केशवाप्रति । दोन्ही सैन्यांमाजी निरुति। माझा रथु ठेविजे ।२१।
जोपर्यंत पाहेन ऐसें। युद्धकामीं राहिले कोण कैसे। युद्ध करूं कवणासरिसें। या रणामाजीं।२२।
हा दुर्बुद्धी कौरवाप्रती। याचे इष्ट जे इच्छुनी आले ती। तया माजी योद्धा मजप्रति । कोण तो पाहेन मी।२३।

**संजय उवाच:**

अगा धृतराष्ट्र राया | ऐसें अर्जुन बोललिया | श्रीकृष्णे त्वरें रथ नेऊनिया | दोन्ही सैन्यांमाजीं ठेविला |२४|

जेथे भीष्म द्रोण मुख करूनी | अवघे पृथ्वीचे राजे जाणोनी | हे मिळाले कौरवातें देखोनी | अर्जुन पाहों लागला |२५|

तेथें पार्थ सकळिकांसी देखे | पितृ पितामहा विशेखें | आचार्य मातुला भ्रातृ अनेके | पुत्रपौत्र आणि सखे अवघे |२६|

श्वशूर सोयिरे दोही सैन्यीं । आणि समस्त बंधूवर्गातें जाणोनि । हे विचारूनिया मनीं । अर्जुन बोलता जाला ।२७।

**अर्जुन उवाच**

पाहे परम कृपेकरून । विषद पावलें त्याचें मन । युद्ध करूं इच्छित स्वजन । ते देखोनि कृष्णाप्रति बोलता झाला ।२८।

दु:ख होतसे माझिया गात्रांसी । मुख शोषते जी हृषिकेशी । कंप रोमांच आले आंगासी । ऐसी स्थिती झाली माझी ।२९।

धनुष्य पडतें हातींहुनी । त्वचा धडधडी दिप्ती करुनी । मज शक्ति नाहीं उभे रहावया लागोनी । मन माझे भ्रमतसे ।३०।

आपुले स्वजन म्या मारूनी | सुख व्हावें ऐसें मज नुपजे मनीं | विपरित चिन्हें दिसती नयनीं | केशवराया मजप्रति |३१|
कृष्णा मज विषयाची चाड नाहीं | आणि राज्यसुखाची गोडी कांहीं | राज्य आणि भोग सकळही | न लगती मज |३२|
ज्या कारणें राज्यभोग बहुत | आपण होतो जी इच्छित | ते ते प्राणघन टाकुनी समस्त | युद्धा आले असती |३३| |पितृमातृपक्षाचे वडिल आजे | भीष्म द्रोण मुख्य बोलिजे | तयांचे पुत्रपौत्र जे | ते माझे बंधुवर्ग |३४|
तरि ते मज मारिती जरी | मी तयाते न मारी गा मुरारी | त्रैलोक्य राज्य प्राप्ती जाहली जरी | तेथ पृथ्वीचा कोण केवा |३५|
आपूल्या बंधुवर्गातें मारिलिया | सुख नुपजे गा कृष्णराया | या आप्तांतें मारलिया | पाप संग्रह होईल |३६| म्हणोनी जी नारायणा | न मारी मी कौरवबंधुजना |

यातें आपण वधिलिया मना । हें सुख न साहावे मज ।३७। जरी ते मज बरवे न पाहाती । तयांची अंत:करणें लोभें उपहत होतीं । परी कुळक्षय केलीय दोष बोलती। मित्रद्रोहाचे पातक ।३८।

त्या पापा पासाव परतिजे। ऐसे कायि नेणिजे। कुळक्षय करिता दोष जाणिजे ।ऐसे आहे जनार्दना ।३९।

जयाचे वंशी कुळक्षय जाला। तयाचा कुळधर्म बुडाला। अधर्म प्रवर्तला। तया कुळी ।४०।

कृष्णा अनर्थ जालिया वरी । नाश पावती कुळीचिया नारी । स्त्री धर्म चळलियावरी। वर्ण संकर होईल ।४१ ।जातिसंकर जालियावरी। पुर्वजासहित कुळ बुडे आघोरी। पिंडोदक क्रिया अवधारी। बुडती देखा ।४२।

म्हणुनि कुळघ्नाचा दोष थोर | तेणें होय वर्ण संकर | बुडती कुळधर्म आचार | जातिधर्म ते हि नाश पावती |४३ |ज्याचा कुळधर्म नाशलियावरी | त्या नरकी वास असे अघोरी | हे मी ऐकतो जी श्रीहरी | स्वामिराया |४४|

हे तव आश्चर्य राज्य थोर | सुख लाभ दोषकर | आणि स्वजन मारूनी सुख अपार | इच्छितो आम्ही |४५ |

श्रीकृष्णा प्रतिज्ञा अवधारी | मी शस्त्र न घे सर्वथा करी | ऐसियासी ते मारिती जरी | ते मज कुशलचि होय |४६|

**संजय उवाच :**

संजय म्हणे गा राया । ऐसे अर्जुन कृष्णाप्रति बोलोनिया ।धनुष्य बाण टाकुनिया । रथा खाले शोक करीत बैसला ।४७।

इतिश्रीमदभगवतगीतासूपनिषत्सु ब्रह्मविध्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे अर्जुनविषाद योगोनाम प्रथमोऽध्याय: ॥१॥

श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

ॐ

# अध्याय दुसरा

**संजय उवाच :**

संजय म्हणे धृतराष्ट्रातें । अर्जुन वष्टिला मोहे बहुतें ।अश्रु आले नेत्राते। ते देखोनि श्रीकृष्ण बोलता जाला ।१।

**श्रीभगवान उवाच :**

अर्जुना हे किल्मिष तुज कोठोनी | उपजे विषम काळीं राहोनी | हे स्वर्गाते नासुनी | अपकीर्ती देईल |२|

पार्थ नपूंसकपण न धरी मनी | हे तुज योग्य नव्हे जाणोनी | हे क्षुद्र टाकी हृदयीहुनी | उठी ये परत युद्धासी |३ |

**अर्जुन उवाच :**

अर्जुन म्हणे मधुसूदना | भीष्म द्रोण गुरुपुत्र जाणा | हे पूजावया योग्य म्हणोना | यांसी युद्ध करू कैसे |४|

गुरु महंत वधुनी राज्य करणे। त्यापरीस लौकिकी भीक्षा आचरणे। उपाय तरी सुखाकारणे। ते रुधीर भोग जाणावें |५|

नणो अधिक उणे होईल कवणा। जयो होईल त्या की आपणा। या कौरवाते मारूनी जाणा। काय जीवित्व माझें |६|

माझे देहीं असे प्रभू। म्हणोनि पुसताते तुम्हां धर्मु | फेडूनी मज मूर्खाचा अज्ञान भ्रमु। कोण आश्रय तो सांगा स्वामी |७|

माझिया इंद्रिया पुष्टीकरितां। मज शोक जाला जी अनंता। तो जाय ऐसें कर्म आचरतां। दिसत नाहीं ‖ आणि पृथ्वीचे राज्य निष्कंटक | इंद्र पद राज्य पावे अधिक |तरी सुख न पावे क्षण एक |नारायणा |८|

**संजय उवाच :**

संजय म्हणे धृताराष्ट्रासी । ऐसे अर्जुन बोलिला श्रीकृष्णासी। युद्ध न करी मी तयासी। म्हणोनि उगाची राहिला ।९।

दोन्ही सैन्यांमाजी असोनी। अर्जुन दु:खित जाणोनी। श्रीकृष्णनाथ हांसोनी। बोलते जाले ।१०।

**श्रीभगवान उवाच :**

अर्जुना शोच्य तें शोचणें। जाणिवेचें बोलणें। गेलिया मेलियाचें दु:ख वाढणें। हे दु:ख न करिती पंडित ।११।

मज तुज या रायासी । गणित नाहीं जन्म मरणासी । आणिकही पुठे सर्वासी । असंख्यात असे ।१२।

पाहे पां जीव असतां देहीं । बाल्यत्व तारुण्य वृद्ध होते कांहीं । तो जीव द्वितीय देह धरितो पाही । तेथे सत्वधीर मो होतें न पावती ।१३।

मात्र तें इंद्रिय जाण । याचे विषय असती प्राण । ते शीतउष्ण सुखदु:खातें म्हणऊन । यासी असत्य जाणावें ।१४। तरी यासी असे उत्पत्ति नाशु । वेदशास्त्री बोलिला सौरसु । तूं अर्जुना न करी शोकाध्यासु । हें अनित्य म्हणोनि ।१५।

जे पुरुष विषयसुख न धरिती । ते उत्तम म्हणिजेती । सुखदु:ख समतुल्य मानिती । तया मोक्ष असे जाण ।१६।

नाही ते नुपजे काहीं। आहे त्यासी अभाव नाहीं। या दोहींचे देखणें देखती पाही। भक्त तत्वज्ञानी ते ।१७।

आत्मा अविनाश तुवां जाणिजे । सर्वव्यापक आहे सहजें ।तया नांव न करू सकिजे दुजें ।हें ज्ञान धरूनी शोक करूं नको ॥ हा देह असे नाशिवंत। आत्मा जाण नाश रहित। यासी नेणे तो अज्ञान म्हणिजेत। म्हणोनि अर्जुना युद्ध करीं ।१८।

एक म्हणे हा मारितो। दुसरा म्हणे हा मरतो। दोघे नेणती हा कोणास कोण मारितो। मरणें मारणें दोन्ही नाही ।१९।

आत्मा जाण नाशरहित। उपजो न लाहे निश्चित। हा अजु नित्य पुरातन शाश्वत। शरीर नासे यासी नाश नाहीं ।२०।

आत्मा जाण अविनाश। अज अव्यय म्हणती त्यास। अर्जुना ऐसिया पुरुषांस। कवन मारू शके |२१|
जैसी वस्त्रें जीर्ण जालियावरी। पुरुष नवीं वस्त्रें परिधान करी। तैसे देहभोग त्यजुनी दुरी। आत्मा आणिके देहीं वर्ते |२२|
तो शस्त्रीं न तुटे कहीं। अग्नीमाजी न जाळे पांही। जळामाजीं बुडणार नाहीं। वायुने न शोषतो |२३|
तो शस्त्रीं न तुटे शोषे |जीव सर्वगत व्यापुनी असे |स्थानवंत अचळ दिसे | परीपूर्ण सनातन |२४|
तो न कळे चित्ती नयव्यक्ती। तयासी अविनाश ऐसें म्हणती। ऐसे जाणुनी तूं किती। वृथा शोक करिशील |२५| आता आत्मा नित्य गुण जो नासे। हे तुज

सकाळ ज्ञान असे।  या कारणें अर्जुना पाहता दिसे।  तुज शोकासी कारण नाही |२६|
उपजलियासी असे मृत्यू । मेलियासी जन्म सत्य ।या कारणें हा परिहारार्थ । शोक न करिजे |२७|
भूतें प्रकृतीपासुनी होती । मरणपर्यंत व्यक्त दिसती । मागु ती प्रकृतीमाजी मिळती।   या करणे वृथा शोक न करिजे |२८|
आत्म्यासी आश्रयरूप कोणी देखती । कोणी आश्चर्यरूप बोलती ऐकती । ऐकोनिया विसरती।   हे आश्चर्य थोर पार्था |२९|
अविनाश नित्यवंत पाही। बांधिला नवचे कहीं। या कारणे सर्व भूतांचे ठायीं। वृथा शोक करू नये |३०|

तू स्वधर्माते जाणसी जरी। तरी भय धरावयासी नव्हेसी अधिकारी। धर्म युद्ध म्हणसी तरी। त्याहुनी क्षत्रियासी अधीक नसे ।३१।

कृष्ण म्हणे पार्थासी ।दैवास्तव पावलिया युद्धासी। जेणे मुक्त स्वर्गद्वार पावसी। ते युद्धी क्षत्रियासी सुख पाविजे ।३२।

तू आपुला क्षात्रधर्म सांडुनि । जरी संग्राम न करिसी रणीं। तरी उत्तम श्रेय हरवुनी। पावती पापातें ।३३।

अधर्म आणि अपकीर्ति। जालिया लोक निंदा बोलती ।तुझे वैरी तुज हांसती। अपकीर्तीपरिस मरण भले ।३४।

भयें करुनी रणींहुनी परतसी । ते कळेल महारथियासी । ज्यामध्ये थोरपणें होतासी। तेथ पावसी लघुत्व ।३५। लोक बोलों नये ते बोलती। तुझे सामर्थ्य वैरी निंदिती। लाज होईल क्षिती । याहुनी दु:ख काय असे ।३६।

मेलिया होईल स्वर्गप्राप्ति। जालिया होईल पृथ्वीपती। ऐसे धरुनी चित्तीं। ऊठ अर्जुना युद्धासी ।३७।

सुखदु:ख सम करूनी। लाभालाभ न धरी मनीं ।जयो अपजयो सांडुनी ।युद्ध करी पाप नाहीं ।३८।

हे बुद्धि सांख्यमतीची सांगितली। योगाभ्यासें जे बोलिली। तें तुज अर्जुना सांगणें भली। तेणें बंधन तुटेल कर्माचें।३९।

कर्मे निष्काम लागती सोसणे। प्रत्यवाय नव्हे बोलणे। थोडयाचि धर्माचि कारणे। भय महा त्तसिल ।४०। व्यवसायात्मिक बुद्धि निश्चिती ।निष्काम परमेश्वरी भजन अर्पिती ।बहु शाखाफळा ते इच्छा करिती ।ते बुद्धि अशेष सांडी अज्ञानाची ।४१।

वेदवाचा असे पुष्पित। कर्मफळास्तव करूनि सांगत। तेचि अज्ञानिया निश्चित। कामना इच्छुनी करिती कर्मे ।४२। सकामबुद्धि कर्मे आचरती। स्वर्गसुखातें पावती। पुण्यसामोग्री सरलिया अंती। मागुती येती ये लोकी ।४३।

भोग ऐश्वर्य मनी धरुनी ।कर्मे नानापरीचीं करूनी ।मनोरथ होताती म्हणोनि। अशक्त जाले तेथें ।४४। त्रिगुणात्मक वेद जाण। होई अर्जुना निर्गुणा निर्गुण। सत्वीं राहे द्वंद्व सोडून। आत्मतत्त्वीं असोनी ।४५।

स्वल्प उदकी अर्थ घडती भिन्न पाही। ते सर्व संपादती महा उदकाचे ठाई। तैसे वेदशास्त्र जाणती तयाचें देहीं। ज्ञान असे देख ।४६।

कर्म अधिक होउनी ।त्याचं फळ न धरी मनीं। कळ विरहित होउनी। कर्मे आचरावीं ।४७।

या कारणे यागातें आचरोनी | अर्जुना प्रकृती कर्माचा संग त्यजुनी | सिद्धी असिद्धी समत्वे धरुनी | वर्तता बोलि जे तोचि योगी |४८|

ज्ञानयोगाहुनी कर्मयोग हीन | या कारणें ज्ञानयोग घरी इच्छून | जे कर्म करिती वासनेन | ते कृपण बोलिजे अर्जुना |४९ |

ज्ञानयोगे करुनी | फळे हरपती दोन्ही | या कारणें तया योगातें अंगीकारुनी | सर्वज्ञी कुशल होई |५०|

म्हणोनि जे योगी कर्म करिती | ते फळ संगादिके त्यजिती | जें जन्मबंधा वेगळे होती | पद पावती निरामय |५१| हे ज्ञान बुद्धि जाणित लिया | मोह सागरी तरिजे धनंजया | पाविजे तया ठायां | हे ऐकणें ऐकसी तेव्हां वैराग्य पावसी |५२| हे श्रवण तुज संदेहरूप वाटेल जरी | तरी संदेह सांडुनी मन स्थिर करी | तेणे निवासिगां अंतरी | योग अभ्यासे |५३|

**अर्जुन उवाच :**

अर्जन म्हणे हृषीकेशी। जो स्थिर बुद्धि त्याची वर्तणूक कैसी। योग पावलिया त्यासी। वोळखी कैसे बोलिजे ।५४।

**श्री भगवान उवाच :**

देव म्हणे गा पार्था। जो नातळे कामना मनोरथा। आपण आत्मस्थिति सुखात्मता। तो समाधिस्त बोलिजे ।५५। दु:खे निश्चळ नि:स्पृह सुखसंगी। भय क्रोध सांडुनी वितरागी। तो मुनी ज्ञानसंगी। स्थिर बोलिजे ।५६।

शुभाशुभ प्राप्त जालिया | ममत्वे न गुंते आणि किया ठाया | आनंद द्वेष बुद्धि नातळे जया | तयासीच ज्ञान जाले |५७ |

कासव आपुले आंग जैसे |आवरी आपुले हात पाय सर्वस्वे | तैसे तो इंद्रिय आवरुनी विशेषे | तयासी ज्ञान प्रतिष्ठिले |५८|

जो निराहारी होउनी असे | त्याचे रसवर्जित विषय तुटती फांसे | साक्षात्कारी योगी मन वसे | मग तो रसाचाही त्याग करी |५९|

जरी पुरुष प्रयत्न करी विचक्षण | ज्ञानी पुरता असोनी आपण | तरी इंद्रिये बलात्कारे हरिती मन | अर्जुना हें जाण निश्चित |६०|

ते सर्व नमावया लागुनी | युक्ति नाही योगाहुनी |सर्व इंद्रिया वश्य केलियानी | तयासी ज्ञान प्रतिष्ठिते |६१|

जो विषयाचे ध्यान करी| त्या विषयासंग काम उपजे अंतरी | कामपासाव क्रोध होय अभ्यंतरी |यासी संदेह नाही |६२|

क्रोधापासुनी उपजे मोह | तो स्मृत्याचे ठाई भ्रांति ठावो | स्मृति बुडालिया बुद्धीचा तुटे भावो| बुद्धिज्ञान बुडालिया नरकी राहाती |६३|

जो रागद्वेष असे वर्जुन| तो राहे आत्मा वश्य करून| इंद्रियासंबंध विषय भोगी नेमून| मने निर्मळ पावे जाण तोचि |६४|

प्रसाद पावलियावरी | सर्व दु:खाची होय बोहरी | आत्मा प्रसन्न करुनि चित्त आवरी| स्थिर बुद्धी प्रगटे तया |६५| युक्तिविण न सांपडे बुद्धि| बुद्धिविण नव्हे भाव-शुद्धी |भावेविण नव्हे शांती सद्बुद्धि| शांतिविण सुख कैचें |६६| इंद्रिय विचरत असतां| जो नावरी आपुलिया चित्ता| तयाचि प्रज्ञा नासे पाहता| जैसी उदकी वायोबळे नांव जाय |६७|

या कारणे  गा अर्जुना।  जो विषयांपासुनी इंद्रिये करी बंधना  ।टाकी इंद्रियांची वासना।  तो ज्ञानी बोलिजे ।६८।

जे रात्री सर्ववेष्ठित भूती।  ते वेळी मुनि योगी जागती।  जेथे भूतांची जागृती।  ते रात्री मुनिश्वराची ।६९।

जळ संपूर्ण समुद्री जाण।  त्यांत उदके जाती मिळोन।  तैशा सकळ कामना होती लीन।  तो शांती पावे नि:कामना विरहित होये ।७०।

सर्व काम सांडुंनी।  जो पुरुष वर्ते निस्पृह होउन।  तो मोहो अहंकार त्यजुनी।  शांती पावे ।७१।

ऐसिया ब्रह्मस्थिती वर्तती ।  ते मोहरूप संसार न पावती।  देह त्याग समयी वस्तु स्मृती।  ते पावती पूर्णब्रह्म ।७२।

इति श्री मदभगवतगीतासूपनिषत्सु ब्रह्मविध्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे सांख्ययोगयोगो नाम द्वितीयोऽध्यायः ॥२॥

श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

ॐ

# अध्याय तिसरा

**अर्जुन उवाच :**

अर्जुन म्हणे श्रीकृष्णनाथा। कर्माहुनी ज्ञान श्रेष्ठ असतां। तरि मज अघोर कर्मी कां अनंता। प्रवर्तवितोसि।१। मिश्रिते वाक्यें येणें। भुलविसी माझे अंत:करण। तरि निश्चित सांग मनें।जेणें श्रेय पाविजेल।२।

**श्रीभगवान उवाच :**

लोकांमाजी द्विधा निष्ठता। त्यापूर्वी सांगितल्या भारता। सांख्यमती ज्ञान ज्ञाता। योगियासी कर्मयोग बोलिजे |३| कर्मारंभ न करिती। आणि सर्व कर्मे उगीच त्यजिती। पुरुष मोक्ष न पावती |तया सिद्धी नाही |४|

कोणी कर्महीन नसती। क्षण एक कर्म न सांडिती। काय असे कर्माची स्थिती। प्रकृतीपासूनी निपजती सर्व कर्म |५| कर्म इंद्रियातें दंडी। आणि मन कल्पना न संडी। तया नाही विषयाचि सांडी। म्हणोनी मूर्ख म्हणावें |६|

जो इंद्रिय मने नेम करी स्वभावी। इंद्रिया हाती कर्मे करावी। कर्मफळाची आशा न धरावी। तो श्रेष्ठ म्हणिजे अर्जुना |७|

तरी तूं वर्णाश्रम कर्म करी। कर्म श्रेष्ठ ते अवधारी। न करिता कर्म त्यजिसि जरी। देहावसानी सिद्धी नाही |८| यज्ञेविण ऐशी श्रुती। तया वेगळी कर्म अन्यत्र अर्पिती। म्हणोनि बंधाते पावती। सकळ लोक |९|

म्हणोनि तू अधीकु धनंजया। कर्माधिकार आहे तुज करावया। फळरी त्यजुनिया आचरावे कर्म ॥ ब्रम्हयाने यज्ञसृष्टि केली। मग आशीर्वादाची उत्तरे बोलिली। तुम्ही बहु यज्ञ करा वहिली। सर्व कामना पुरतील |१०|

तुम्ही भावे देवाते पूजा। ते तुम्हा प्रसन्न होती सहजा |परस्परे तुमचिया भावे काजां। श्रये देतील |११|

मिष्टान्न भोगे करूनि। ज्या देवास अग्निमुखे समर्पूनी। ते देव प्रीतीभावे आंगीकारूनी। फळ देतील कल्पनेचे |१२| यज्ञ कर्मे न करितां। तो तस्कर म्हणावा तत्वता |यज्ञेविण कर्मा आवरतां। वृथा जाय ॥ जे यज्ञ करुनी शेष

भक्षिती। तयांची सर्व किल्मिषें नासती। जे उदरार्थ पचउनी भक्षिती। तितुके भोगिती पाप देखा।१३। अन्नापासुनी होती भूते। ते धान्य पर्जन्ये निपजे बहुत। तो पर्जन्य यज्ञाचेनी सुकृते। तो यज्ञ कर्मापासुनी।१४।

ते कर्म ब्राह्मणापासुनी। तो ब्रह्मा अक्षरिहुनी। याकारणे ब्रह्मा अज्ञुनी। नित्य यज्ञकर्म करितसे।१५।

ऐसे ब्रह्मच की प्रतिष्ठिले। ते जन्मा येउनि नाही प्रतिपादिले। ते तामस वृक्ष जन्मले। भूमिभार होऊनिया।१६।

जे आत्मरतीचे ठाईं राहिले। आत्मसुखे तृप्त जाले। स्वस्वरूपीं विश्रामले। तया कर्मे न लगती।१७।

तया कर्मे न करुनी कांही। परस्परे गुंतले नाही। तैसेची सर्व भूतांच्या ठायी। नेमिती आश्रय कोणाचा।१८।

या कारणे लौकिकी सतत। कार्या-कारणे कर्मी असावे किती ।स्वकर्म आचरतां निश्चित। पुरुषार्थ पावती ।१९। जनकादिक जे विदेही जाले। ते कर्मे करूनी सिद्धी पावले। म्हणोनी श्रेष्ठ जे बोलिले ।तीही लोकीं संग्रहार्थ कर्म कीजे ।२०।

जे जें श्रेष्ठ वर्तती। लोकही तैसें आचरती। जैसे ते प्रमाण करिती। तैसेंचि वर्तती लोक ।२१।

अर्जुना त्रैलोक्याचे ठायीं। मज कांही कर्तव्य नाही। आणि जे पावणे ते अप्राप्त नाहीं। आणि सर्व कर्मे मी आचरतो ।२२।

जरी मी हे न वर्तवी। तरी कर्मे बुडतीं स्वभावीं। माझिये आचारणुकेकरवीं। लोके तैसे वर्तती ।२३।

जरी हे मी कर्म न करी। तरी वर्णसंकर होईल अवधारी। लोक भ्रष्टती यापरी। ते कर्तृत्व मज घडेल ।२४।

ते लोक नेणती कांही | वडिलासारिखे वर्तती पाहीं | म्हणोनी श्रेष्ठीं दाटुनी सोयी | लोक संग्रहार्थ कर्म कीजे |२५| ज्ञानिये ते एकाग्र होउनी | सर्व कर्मे उत्कर्षे करूनी | ज्ञानियांनी कर्मे आचरावी दाटुनी | तया स्वये बुद्धि असे |२६| प्रकृतीचे त्रिगुणाचे कार्य | म्हणसी क्रिया उपजती गुणमय | नेणती यासी संतोष होय | मी सर्व कर्मे करितसे |२७| जया सत्त्वगुण असे अर्जुना | तो करूनी न लिंपे गुणकर्म लक्षणा | गुणां गुणी वर्तती म्हणवून | आपण नव्हे अशक्त |२८| प्रकृतीच्या गुणाते मोहिती | मूर्ख गुणकर्मी आसक्त होती | तेथे ज्ञानियांची युक्ती | काही न चले |२९|

तू कर्मे अवघी मज अर्पी | चित्त आत्मयाच्या ठायीं समर्पी | उदार होऊनिया निरापेक्षी | युद्ध करिता होय |३०|

हे माझे ज्ञानमत। जो नर वाही हृदयी अखंडित। निर्द्वंद्व श्रद्धा युक्त। तो मी करी विरक्त पां। ३१।

हे तुजप्रति म्या सांगितले। ते न पाहाती न प्रवर्तती मनुष्य जन्मा आले। सर्व ज्ञानापासुनि चकलें। ते मूर्ख श्रेय न पवती भ्रष्टपणे।३२।

ज्ञानि असला जरी। प्रकृती चेष्ट स्वभावे करी। पंचभूतें प्रकृतितें पावती अवधारी। तयार निग्रह काय करील।३३। जया इंद्रिया कल्पना बहुत। रागद्वेषें असे वर्तत। ते तेथें होती अशक्त। मोक्ष पावती कैसेनी।३४।

आपला धर्म अल्प असोनि। परधर्म बरवा देखोनी। परी आपला धर्म बरवा जाण मनीं। पर धर्मी भय असे।३५।

**अर्जुन उवाच :**

ह्रा कोणे प्रेरिला प्राणी | पाप आचरतो दाटुनी | इच्छिलिया वांचुनी | बळत्कारे कोण करितसे |३६ |

**श्रीभगवान उवाच :**

देव म्हणती गा पार्थ | ते कामक्रोध वैरी जण निभ्रांत | रजोगुणापासूनी होत | पाप जाण |३७|
अग्नि झाकोंळला धुम्रबळें | दर्पण जैसे कां मळे | गर्भ वेष्टिला जारें सकळें | तैसा आत्मा अज्ञाने करूनी |३८|

तैसें ज्या कळले तेणे | म्हणुनी ज्ञानियाचा नित्य वैरी म्हणे | म्हणोनि कामरूप दहणे | दुरी करुनी त्यजावीं |३९| इंद्रिय आणि मन बुद्धि | यांसी काम अधिष्ठान आधीं |यांते भुलवुनी त्रिशुद्धी | ज्ञान लोपितसें |४०|

या कारणें या आणी मना | तूं नेमी गा अर्जुना | सांडी पाप कर्म जाळून | ज्ञानें विज्ञान नासितसे |४१|

इंद्रियाहुनी बोलिजे मन | मनाहुनी बुद्धि अधिक जाण | बुद्धिहुनी अंत:करण | सर्वात श्रेष्ठ |४२|

ऐसें जाणोनि घे अंत:करण | तैसे आत्मेनी परमात्म तत्त्वज्ञान | वीतरागी जाळून | काम दुरी करी |४३|

इति श्री मदभगवतगीतासूपनिषत्सु ब्रह्मविध्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे कर्मयोगोनाम तृतीयोऽध्यायः

श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

ॐ

# अध्याय चौथा

**श्रीभगवान उवाच :**

अव्यययोग पूर्वी सांगितला रवी । सूर्ये मनूस दाखविला स्वभावी । मनूने इश्वाकुसी निरोपिला ।१।

ऐसा परंपरा चालिला । जो हा राजऋषीही जाणितला । बहु काळें बुडाला । कर्मयोग रे अर्जुना ।२।

आणि तें हें म्या तुज बुद्धि | योग सांगितला अनादि | तूं सखा भक्तनिधी | म्हणोनि रहस्य उत्तम सांगितले |३ |

**अर्जुन उवाच :**

अर्जुन म्हणे श्रीकृष्णानाथा | तुझा अलिकडे जन्म असता | तू सांगतोसि अनादि सूर्याची कथा | ते कांही न कळे मज |४|

**श्रीभगवान उवाच :**

कृष्णे म्हणितले तुज मज | बहुत अवतार जाले सहज | तें अवघें ज्ञान आहे मज | तूं नेणसी अर्जुना |५|

अव्ययोमि आत्मावतारु | सर्व भूतांच्या ठायीं ईश्वरु | प्रकृतीचे ठाई निरंतरु | मायाधीन जन्म धरितसे |६|

जे जे काळी धर्मासी | स्थान भ्रष्ट होय परियेसी | ते काळी अवतरुनी तयासी | स्थापिता होय |७|

पवित्र साधु तरावे | आणि दुष्टासी नाश करावे | धर्मासी स्थापन व्हावे | म्हणुनी युगायुगी मी अवतरे |८|

माते जन्मकर्म दिव्य असे जाण | तयाचि खूण ज्ञानी धरिती आपण | तया नाही जन्म मरण | तो मज पावे निश्चित |९|

अभिलाष भय क्रोध त्यजिती | माझिया आश्रये करूनी असती | बहुत ज्ञान तपें मज पावती | पवित्र होऊनिया |१०|

जैसे ते मज भजती | त्यासी मी भजे तैसिया रीती | माझे मार्गी वर्तती | सकळ लोक रे अर्जुना |११|

जे कर्मसिद्धी इच्छुनी | चित्त ठेविती अन्यदेवता भजनीं | ते मनुष्यलोकीं तत्क्षणीं | कर्मफळ पावती जाण |१२|

म्यां सृजिले चतुर्वर्ण | गुणकर्म विभागून | त्याचा कर्ता अकर्ता मी जाण | परी अलिप्त अव्ययें असे |१३|

तयाचे कर्मी न लिंपे पाही | कां जे मजकर्मी इच्छा नाहीं | ऐसें जो तत्व आणे पाही | तो कर्मी न बांधिजेल |१४| ऐसे जाणुनी करी कर्म | पूर्वी मोक्ष इच्छुनी केला हा धर्म | त्या कारणें वर्णाश्रम | हे पूर्वी पूर्वजी केले होतें |१५| कर्म अकर्म तें

कोण | दोन्ही बांधला नाहीं पां कवण | ऐक ते मी निवडोन सांगेन | ते जाणील त्या उत्तम मोक्ष होय |१६|

कर्मी ज्ञान असावें | विकर्म मनी जाणावें | अकर्मी चित्त न द्यावें | कर्म गति गहन म्हणोनियां |१७|

कर्म ते कर्म पाहे | अकर्म ते कर्म म्हणोनि राहे | तो मनुष्यलोकी बुद्धिमंत होय | योगी सर्व कर्म करितसे |१८|

जो सर्व कर्म करी |संकल्प कामना त्यजुनी आदरी | ज्ञानाग्नीने कर्म जाळी तरी | तो बोलिजे ज्ञानिया |१९ |

जो कर्माचा फलसंग त्यजी | नित्य तृप्त होउनी निराश्रय यजी | जो प्रकृतीकर्म सहजी | न बांधिजेल तो |२०|

चित्त आत्मा नेमुनी निरसी |सांडी सर्व परिग्रहासी | केवळ कर्म करी शरीरासी |
तरी न पवे तो शुद्ध जाण |२१|

अलाभी दु:ख लाभी संतोष न धरी | सिद्धी असिद्धीची कल्पना न करी |द्वंद्वातीत
नि:स्पृह विचारी | ऐसे कर्म करी तो न बाधिजेल |२२|

ज्ञान स्थिरावुनी जरी | गतसंगमुक्त धरी | ऐसे जाणोनी कर्म आदरी | तरी समग्र
पापें जातील |२३|

अपर्ण हव्य आणि अग्नि | होमकर्ता हे ब्रह्म जाणुनी | ब्रह्म कर्म समाधी करूनी | तो
ब्रह्मचि पावे |२४|

एक योगी ऐसे करिती | ब्रह्मयज्ञ म्हणोनि उपासिती | एक साक्षात् अग्नि होमिती | ब्रह्मार्पण म्हणोनिया |२५| श्रोत्रादि जी ज्ञानेंद्रिये | संयमाग्नीसी होमिती तयें | शब्दादि विषयें | ते इंद्रियासी होमिती |२६|

सर्व इंद्रियां कर्म प्रमाण | दुसरें प्राण कर्म असे जाण | आत्म संयमाग्नीचे ठायीं करिती हवन | दिप्ती ज्ञाने करूनी |२७|

तेथें होमिताती एक द्रव्य वेजिती | एक त्रिविध तपें करिती | एक योगातें अनुष्ठिती | एक स्वधा यज्ञ दान करूनीया |२८|

आपण होमिती प्राणी | परब्रह्मी प्राण अपान हे दोन्ही | बैसती प्राणाअपानाते धरुनी | ते प्राणायाम परायण |२९| अल्प नेमिलेनी आहारें | प्राणायाम नेमिती निर्धारे | तयासी सर्व यज्ञ फळ पुरे | येणे किल्मिषें नाशती |३०|

हे यज्ञ करुनी शेष भक्षिती | ते परिपूर्ण अमृतपाने ब्रह्म पावती | यज्ञ यजन न करिती | तया इहलोक ना परलोक |३१|

ऐसे हे बहु यज्ञ विशेखी | असती वेदी आणि ब्राह्मणाचे मुखी | तया अवधिया कर्मविधी देखी | जाणितल्या मोक्ष होय |३२|

जे म्यां बोलिले द्रव्ययज्ञ आदि करुनी | ब्रह्मार्पण यज्ञ हुतासुनी | सर्व कर्मफळ अविनाश जाणोनि | ज्ञानरूपी समाविली |३३|

ते गुरुसी नमस्कार करूनी | सेवा करूनी पुसोनी | उपदेश ज्ञान विचारुनी | ज्ञानतत्व देखिजे |३४|

अर्जुना न पावसी मोहातें तत्वता | हे जाणितलीया मागुता | सर्वाभूती आत्मा विशेषता | देखशील तूं |३५|

जरी अत्यंत पापे असती | ते आचरलिया ज्ञानस्थिती | तयातेंहि स्वर्ग प्राप्ति | इहलोकी दु:ख कैचे |३६|

जैसे काष्ठभार इंधन | भस्म होई अग्निसंग आपण | तैसे सर्व कर्म अर्जुना जाण | दग्ध होय ज्ञानाग्नीनें |३७|

तरी ज्ञानासारिखें पवित्र | आन नाहीं गा सर्वत्र | त्या ज्ञानासी योग करिताती निरंतर | ज्ञाने करूनी ब्रह्म पाविजे |३८|

ज्ञान पाविजे भक्ति करूनी | इंद्रिये नेमिजे तत्पर होउनी | ज्ञान निष्ठेने पाहोनी | शांती तात्काळ पाविजेल |३९| ज्ञान आणि भक्तिहीन | तो संशयात्मक पावे आपण | तया इहलोक पर नाही जाण | संशयात्मका सुख कैचे |४०| योगे टाकी कर्माते | ज्ञाने नाशी संशयाते | आत्मकर्मी वर्तता तयाते | तो न बाधे धनंजया | ४१ |

या कारणे हे ज्ञान । हृदयी नुपजे संशय करून । ज्ञान शस्त्रे संशय  तोडून । कर्म अंगिकारूनी उठे अर्जुना ।४२।

इति श्री मदभगवतगीतासूपनिषत्सु ब्रह्मविध्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे ज्ञानकर्म संन्यास योगोनाम चतुर्थोऽध्यायः ॥४॥

श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

ॐ

# अध्याय पांचवा

**अर्जुन उवाच :**

अर्जुन म्हणे श्रीकृष्ण नाथा | पूर्वी संन्यास आणि कर्मयोग सांगितला होता | तरी कर्म की संन्यास आता | तो मज सांग निश्चयेसी |१|

**श्री भगवान उवाच :**

श्रीकृष्ण म्हणे गा पार्था | कर्मसंन्यास उभयतां | फळ एक दोहींचे विचारिता | परंतु कर्म श्रेष्ठ |२|

जाणावया ऐसे नित्य संन्यासी | जया द्वेष नाही मानसी | तो द्वंद्व तुटोनी पावे ज्ञानासी | बद्धापासुनी सुखे सुटे अर्जुना |३|

सांख्य आणि योग हे दोन्ही | यासी वेगळे म्हणती अज्ञानी | ते भिन्ने नव्हती म्हणोनि | दोहींचे फळ एक |४| सांख्येन स्थान पाविजे | योगेहि तेंची भोगिजे | सांख्ये आणि योगे एकचि जाणिजे | ऐसे जो देखे तो देखे ना |५| योग विरहित दु:खी होती कांही | न पावेगा संन्यासें कांही | योगे करूनिया पाही | सुख त्वरितचि होय |६|

योग कर्म गा केलिया | शुद्धत्व होय आत्मया | जितेंद्रियासहित आपणिया | सर्वभूती आत्मत्व देखें |७|

श्री सोपानदेवी

योगी कर्म करुनिया म्हणती नाहीं | देखणे ऐकणे स्वरूप पाही | गंध भोजन न मने निद्रा कही | श्वास टाकणे आठ ही कर्मे |८|

बोलणे  आणि घेणे देणे | पातया पाते लावणे उघडणे | हा इंद्रियांचा व्यापार इंद्रिया कारणें |  कोणास संबंध नाहीं |९|

ब्रह्मार्पण कर्म करी | मग त्यजुनी असे निर्धारी | पापे न लिंपे तो ऐसिया परी | पद्मपत्री उदक जैसें |१०|

काया इंद्रिय मन बुद्धि | योग कर्म करिती कैवल्यसिद्धि | त्यांचा संग त्यजुनी आधी | आत्माचि होय |११|

योगी कर्मफलाची इच्छा त्यजुनी | तो शांतिनिष्ठ पावे मनी |  कामनेस्तव अयुक्त कर्म आचरोनी | याने अशक्त होऊनि बाधिजेल |१२|

सर्व कर्म मनांपासुनी न्यासी | तो सुख पावे संन्यासी | असतां नवद्वारे देहासी | करिता ना करविता |१३|

कर्तृत्व आणि कर्म करणें | कर्माचे फल भोग भोगणे | हे परमात्मयापासोनी नाहीं होणें | जाण स्वभावे लोक वर्ततसे |१४|

पाप पुण्य न लिंपे आपण | ज्ञान झाकोळलें अज्ञाने करून | प्राणी बांधले मोहे जाण | सर्वही जीव देख |१५|

तरी आतां ज्ञान अज्ञान | नासावें आपुले आपण | तैं अज्ञान जाय निरसोन | ज्ञान प्रकाशे सूर्याचे परी |१६|

त्याचे ठाई बुद्धि अंत:करण असे | आणि पारायण असोनी निष्ठा दिसे | तयाचे पाप ज्ञाने करूनी नासे | मोक्ष पावे निश्चयेसी |१७|

ब्राह्मण आहे विद्यासंपन्न | त्यांसी नम्रता परिपूर्ण | तयासी गाई ब्राह्मण श्वान | चांडाळ तोहि सम देखे |१८| इहलोकी तींही असता | स्वर्ग लोक जिंकिला तत्वता | त्यासी समबुद्धि जाली निभ्रांता | तो निर्दोष सम ब्रह्मी स्थीर असे |१९|

बरवे प्राप्त जालिया संतोष नाही | वाईटाचे दू:ख न पवे कही | ऐसे जे पुरुष असती पाही | ते निर्दोष ब्रह्मी स्थीर होती |२०|

जो विषयासक्ति टाकोनी राहिला | आत्मसुख जाणोनी स्थिरावला | तो ब्रह्मयोग पावला | मोक्ष सुख |२१|

इंद्रिये संबंधे भोग होती | ते दु:खाची कारणे करिती | अर्जुना जे कां उपजोनी नाशती | या कारणे ज्ञानी न धरिती सुख तेथे |२२|

शरीर जोपर्यंत आहे | तोपर्यंत काम क्रोध साहे | तोचि योगी जाणावा पाहे | तोचि सुखी जाणिजे |२३|

जे अंतरी निवाले आत्मसुखे | बाहेरीच कांही न देखे | ब्रह्म निर्वाण होउनी विशेषे | ब्रह्मी योगी ऐक्य होती |२४| जे ब्रह्मी ऐक्य होती | तयाची कल्मषें नाशती | द्वैत छेदुनी आत्मस्थिती | सर्व भूती हित देखे |२५|

काम क्रोध सहित | विकारे जिंकिले समस्त | ते ब्रह्म निर्वाण त्वरीत | आनंदी वर्तती |२६|

सर्व इंद्रियें बाहेरिली बाहेरी | धरी भीतरील भीतरी | भरी चक्षु भृवांतरी | नासाग्री प्राण अपान सम करुनी ठेवी |२७|

आणि इंद्रिये मन बुद्धि | इच्छा भय क्रोध हे जिंकिले आधी | तो मोक्ष परीक्षण शुद्धि | जीवन मुक्त बोलिजे |२८| यज्ञफळ तयासीच जाले | इहलोकी ईश्वर तयासीच म्हणतिले | सर्व भूतीं मित्रत्व लाधले | जाणावे ते पावले शांतिपद |२९|

इति श्री मदभगवतगीतासूपनिषत्सु ब्रह्मविध्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे संन्यासयोगोनाम पंचोमोऽध्यायः ||५||

श्रीकृष्णार्पणमस्तु ||

ॐ

# अध्याय सहावा

**श्रीभगवान उवाच :**

जो कर्माचे फळ नुपेक्षित कर्म करी । तया म्हणती संन्यासी अवधारी । तोचि सान्हिक कर्म करी ।कर्म त्यागी तो नव्हे ।१।

ज्यातें संन्यास ऐसे बोलती । तोचि योग जाण निश्चिती । जेणें संकल्प टाकिला नाही किरीटी ।  तो योगी कधी नव्हे ।२।

जो मुनी योग इच्छिती | तयासी कर्मची बोलिजेती | योग पावलिया होईल शांति | समबुद्धि तोची जाणो |३| इंद्रियार्थी जाले हिन | कर्म निपजो राहिले आपण | तयासी सर्व संकल्प म्हणवून | योगारूढ तो बोलिजे |४|

उद्धरी आपणिया आपण | साधिजे आपणिया आपण | तो गा आपुला बंधु जाण | जया स्वाधीन नाही अंत:करण | तो वर्ते शत्रुत्वे |५|

आत्मा जेथोनि शांति पावे | तया हृदयी परमनिष्ठा जाणवे | ऐशियासी शितोष्ण सुखदु:ख न पवे | तैत्याचि मानपमान |६|

तथा ज्ञानविज्ञाने तृप्ति जाली | अविनाश हुते इंद्रिये जिंतिली | तया लोष्टकांचनसम भासली | ऐसें शांति योगी बोलिजे |७|

सोई रे बंधु आणि मित्र जाण | वैरी पापी आणि उदासीन | तया अवघीया देखे समान | तो श्रेष्ठ बोलिजे |८|

योगी एकांती बैसोनी | असावे आत्मरहस्य ध्यानी | चित्त आत्मा जिंतोनी | आशा टाकोनी परिग्रही उदास |९| पवित्र शुभदेशी प्रतिष्ठोन | स्थिर करावे आपुले आसन | उंच नीच नसावे जाण | बैसावया कुश: कृष्णाजन वस्त्र |१०|

मग इंद्रिय चित्त नेमुनी | बैसावया तया आसनी | आत्माशुद्ध व्हावया लागुनी | योग करावा |११|

काया सम करुनी कंठी हनुवटी | दृष्टि दिजे नासिका पुटी | स्थिर कीजे श्वासाचिये परिपाटी | दिशावलोकन करावे |१२|

निर्मळ अंत:करण करोनी | निर्भय मनी होऊनी | ब्रह्मचर्य आचरोनी | सर्व भावें मजलागी |१३|

चित्त ठेवी माझ्या ठायी | मीच निजवस्तु पाही | समाधिनिष्ठ होउनी राही | मज तत्पर अर्जुना |१४|

सदा प्राणायाम लक्षी असता | योगी मनासी जिंतिती सर्वथा | मन जिंतिलिया पावे तत्त्वता | शांति माझ्या ठायी |१५|

योगीयासी अति आहार नसावा | आणि आहाराचा अति त्याग नसावा | जागृति स्वप्नी असावा | स्वल्पमात्र |१६| युक्त आहार ज्याचा पा अल्प | आणि व्यवहार कर्म चेष्टा करी स्वल्प | जागृति स्वप्नाचे ठायी असे नेमस्त | तयासी कदा दु:ख नाही |१७|

ऐसिया योगाचेनि बळें | चित्त आत्मायामाजी मिळे | सर्व कामापासुनी निस्पृह तयेवेळे | युक्त संन्यासी बोलिजे |१८|

चित्त नेमिले असे | केवळ आत्मचि दिसे | निवांतस्थानी दीप असे | तैसी उपमा योगियासी |१९|

जयाचे योगाभ्यासी मन निरोधन | जे ठायी आसक्त होय आपुले मन | तो तेथे आत्मयाते आत्मवी जाण | पाहोनि सुखी हो |२०|

अति सुख जे अनुभवे करूनी | इंद्रिया अगोचर बुद्धि ज्ञाने जाणोनि | तो स्थिर दृढ आपुले मनी | तो न चळे कहीं निश्चित |२१|

या परता आणिक लाभ नाही | राहोनी सुखाच्या ठायी | अत्यंत दु:ख पावेचि तरी | तो सदा सुखी |२२|

जेथे दु:खसंबंध नाही | तोचि योग जाणावा निश्चित पाही | वैराग्ययुक्त अंत:करण करूनी राही | नित्य युक्त |२३| मनापासुनी उपजती कामना | त्या सर्व टाकोनी निःशेष जाणा | नमें करूनी अंत:करणा | इंद्रिय समूह आवरावी |२४|

हळुहळू धैर्यबुद्धि करूनी | मन विषयापासुनी परतुनी | आत्मवी राहोनी | आणिक चिंतन न करावें |२५|

मन चंचल नाही स्थिर | धांवे सैराट न धरी धीर | तया आवरूनी विचार | राहे आत्मत्वीं |२६|

अंत:करणी शांत ज्याचे चित्त | तया योगियाते सुख पावे अत्यंत | रजोगुण शांत होऊनी जाला ब्रह्मभूत | तो परहित जाणावा |२७|

सदा आत्मचिंतन करिता | योगी कल्मषे जिंतिती तत्वता | सुखाचि ब्रह्मी सायुज्यता | अनंत सुख पावेल तो |२८| आत्मत्वें सर्व भूते देखें | सर्वात्मा आपणचि कौतुके | योगयुक्त आत्मा तोचि देखे | सर्वत्र समान तया |२९|

तो मज सर्वाठायी वोळखे | मी तयासी सर्वत्र देखे | मी त्याचे नि तो माझेनि सुखदु:खे | वेगळा नव्हे |३०|

सर्व भूतस्थित ते आत्मवी भजत | सर्वथा ते संसारी नाहीं वर्तत | मज वेगळा नाही होत | तो मीच असे |३१| आपुलेनि सुख दु:खे सर्वत्र | जो देखती जीव मात्र | ते योगी परम पवित्र | ज्ञानिया तो |३२|

**अर्जुन उवाच :**

अर्जुन म्हणे जो हा योग सांगितला | देव तो म्यां नाही देखिला | चंचळ मन हे याला | निग्रह केवी घडे |३३|

हे मन चंचळ बहु कृष्ण | इन्द्रियाहूनि बळकट गहन | वायूचे परी जाय घेऊन | ते निग्रह नव्हें |३४|

**श्रीभगवान उवाच :**

अर्जुनासी म्हणितले मधुसदने | संशय सांडी मन निश्चळ होय येणें | वैराग्य घेउनी अंत:करणे | आणी योगाभ्यासे |३५|

ज्याचें अंत:करण स्थिर नाही | तो दु:खे करुनी योगासी न पवे कहीं | ज्यासी आत्मा वश्य जाला पाही | तो उपाय योगासी पावे सत्य |३६|

**अर्जुन उवाच :**

अर्जुन म्हणे श्रीकृष्णनाथा । भक्तियुक्त होउनी प्रयत्न करितां । योगासी चळोनि सिद्धी न पवतां । जाय त्यासी कोण गति ।३७।
ब्रह्म मार्ग मूढपणें न पवतां । तयासी उभय भ्रष्ट म्हणती तत्वता । याचि गती विचारितां । नासे अभ्र जैसे ।३८। अर्जुन म्हणे श्रीकृष्णा । हा माझा संशय छेदावा जाणा । तुज वेगळा या मना । नाहीं छेदितां संशयातें ।३९।

**श्रीभगवान उवाच :**

देव म्हणती योगाभ्यासी नाश नाहीं | ऐसे नाहीं कवणासी घडलें पाही | बापा तरी मोक्षमार्ग चालता कहीं | दुर्गति नव्हे |४०|

पुण्यवंत जो लोक स्वर्गवासी | तो भ्रष्ट पावोनी भोग भोगिती सुखेसी | मग तो उपजे पवित्र हो इहलोकी वंशी | लक्ष्मीवंताचे घरी जन्मे |४१|

अथवा योगीयाचे कुळीं जन्मोनी | आपुलिया पूर्व पुण्यें करूनी | हे लोकामाजी दुर्लभ म्हणोनी | मानिती जग समस्त |४२|

जया जन्मदेह पूर्वबुद्धि | संयोगे विचरी योग सिद्धी | मोक्ष प्रयत्न करी आधी | ज्ञानाभ्यासबळे |४३|

हृदयीं होता पूर्वाभ्यासाचा धडा | म्हणोनी योग तयासी स्मरला पुढा | योगातें जाणोनी इच्छितो विचार गाढा | शब्द ब्रह्मीं वर्ततो |४४|

तो स्वये ज्ञान प्रयत्न करी | योगें दोष दु:खे होती दुरी | मग तया बहु जन्मांतरी अवधारी | परमगति तो पावे |४५| तपस्वी आणि ज्ञानी | अत्यंत कर्मनिष्ठ असोनि | यापरिस योगी अधीक जाणोनि | या कारणें तू योगी होय |४६| सर्व योगेश्वरा माझारी | माझे ठायीं अंत:करण ठेवी निर्धारी | तेचि भक्तियुक्त अवधारी | तो योगी मज मानला |४७|

इति श्री मदभगवतगीतासूपनिषत्सु ब्रह्मविध्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे आत्मसंयम योगोनाम षष्ठोऽध्याय: ‖६‖

श्रीकृष्णार्पणमस्तु ‖

श्री सोपानदेवी

ॐ

# अध्याय सातवा

**श्रीभगवान उवाच |**

श्रीकृष्ण म्हणती अर्जुना अवधारी । मन माझे ठायी ठेउनी योग करी । तुझे संशय नाशती जयापरी । ते सांगेन ऐक आता ।१।

ज्ञानविज्ञान सहित । तुज सांगेन समस्त । ते जाणितल्या निश्चित । जाणणें कांहीच नुरे ।२।

मनुष्याचिया सहस्रामध्यें । सिद्धितें पावे एखादे । ऐसिया सिद्धा सहस्त्रामध्यें । मज जाणे एखादा ।३।

पंचभूते आणि षट । बुद्धि आणि अहंकार आठ । ऐसी हे माझी प्रकृति जुनाट । असे वेगळाली ।४।

इहींहून आणिक असे प्रकृति । जे जीव भूतातें महाबाहो धरिती । उत्पत्ति प्रयळ स्थिति । ते तियें माजी ।५।

सर्व भूताचियोधनि । वर्ते तयातें अधिष्ठुनी । ते जाली मजपासुनी । उत्पत्ति प्रळय ती पात्सुनि जाण ।६।

म्हणोनि मज परतें कांहीं । अर्जुना आणिक उरलें नाहीं । मी अवधीयाच्या ठायी । जैसे सूत्री मणी पटीं तंतु ।७। मी सर्व रसाचि गोडी । अर्जुना चंद्रसूर्य तेज माझी प्रौढी । पुरुषी पुरुषत्व वेदबीज गाढी । ॐ कार उच्चार तो आण मी ।८।

पृथ्वीचा गंध विषयो । अग्नीच्या ठायी तेज जयो । जीवाचा जीवपण ठावो । तपस्वियांचे तप ते मी ।९।

सर्व भूतांचे बीज होऊनी । सर्व वर्तणूक मजपासूनि । बुद्धिवंताचि बुद्धि आदि करुनी । तेजस्वियांचे तेज मी ।१०। बळिवंताचे बळ । काम राग विवर्जित सकळ । धर्म विरोधी भूति केवळ । काम तो मीच जाण ।११।

सात्विक राजस तामस भाव । मज  पासुनि जाले सर्व । ते आहेत मज आधीनत्व । तयामाजी मी नाही ।१२। त्रिगुण मजपासुनि जालें ।  तेथूनि हें विश्व रचिलें । तेणे भुलोनी मज चुकलें  । मेणति परम अव्यय ।१३।

माझिये माया त्रिगुण । त्यजावया अवश्यक जाण । जे करिती माझे भजन । ते हे माया तरती देखे ।१४।

पापी अथवा मूर्खजन । जे मज नेणती अधम जाण । माये  करुनी हारपलें त्यांचे ज्ञान । ते असुर भावे आश्रयो करिती ।१५।

लोक चतुर्विध भजती मज । अर्जुना ते नर आहे  ती सुकृताचें बीज । तत्वज्ञान जाणुनी इच्छ्छिती सहज । दु:खी अर्थीं कामी एक ज्ञानी जाण ।१६।

तयामध्ये नीतियुक्त करुनी । एक भक्त श्रेष्ठ ज्ञानी । यासी मी आवडे म्हणोनी । ज्ञानी तो मज प्रिय ।१७।

सर्वस्वे जे उदार असती । त्या माजी ज्ञानी ते आत्मा होती । मी तया होय उत्तम गति । म्हणोनी आश्रय असती माझे देख ।१८।

बहूत जन्म कष्टोनी । ज्ञान पावलिया माझे कृपे करुनी । हे सर्व वासुदेव जाणोनी । जे महात्म्या दुर्लभ ।१९। अभ्यासें करुनी अज्ञान हरिलें । अन्य देवतातें भजो लागले । ते तेणें मज अंगिकारिले ते जाले । आपले कृपे करुनिया ।२०।

श्रद्धे करुनी आन देवती भजती । तयाचि आराधना करिती । तयाची कामना तृप्ती । ते मीचि करी ।२१।

श्रद्धे करुनि आन देवती भजती । तयाची आराधना करिती । ते इष्ट काम पावती । तया अचळ श्रद्धा मीचि देता होय ।२२।

जे हीन बुद्धि मागती । ते नाशिवंत फळ तात्काळ पावती । जया जे भजन तया तेचि गती । मज भजती ते पावती माते ।२३।

माझे निजस्वरूप नेणती । अव्यक्त व्यक्ती आले म्हणती । माझा उत्कर्ष भाव नेणती । मूढपणे लोक ।२४।

सर्वांसी प्रगट नाही । योगमायेने वेष्टिले पाही । मी अज अव्यय असोनही । मूढ लोक नेणती मज ।२५।

पूर्वी जी जाली भूतें । आतां वर्तमान जें वर्तते । भविष्यही मज अवघे कळतें । लोक नेणती अर्जुना ।२६।

इच्छा द्वेषा पासून । दुष्ट मोहो उपजला तेथून । ते भूतसृष्टीचे आदि जाण । मोहाते पावती अर्जुना ।२७।

ज्याचे कां पाप गेले । ते द्वन्द्व मोही निर्मुक्त जाले । ते माझे भजती रिघाले । दृढ बुद्धि करूनी ।२८।

जरा मरण नाशार्थीं । माझे ध्यानीं यत्न करिती । ते सर्व ब्रह्म जाणती । कर्म अध्यात्म अवघे ।२९।

आधीभूत आधी दैवत माझ्या ठायी । जाणती आधी यज्ञही । मरण काळी मज जाणितले पाही । योग मुक्त ते जाले ।३०।

इति श्री मदभगवदगीतासूपनिषत्सु ब्रह्मविध्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे ज्ञानयोगो नाम सप्तमोऽध्याय: ॥७॥

श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

ॐ

# अध्याय आठवा

**अर्जुन उवाच** :

श्री गणेशाय नम: ।

अर्जुन म्हणे गा पुरुषोत्तमा । कैसा निवाडा अध्यात्मा आणि कर्म ब्रह्मा ।
आधीभूत आधीदैवत आम्हां । निवडुनी सांगा ।१।

आधीयज्ञ कैसा कोण । देही जाणावा कवण । अंत:काळी तूं मधुसूदन । मज कैसेन पावसी ।२।

**श्री भगवान उवाच** :

देव म्हणे अक्षर तें ब्रह्म । तेथे परम सद्भावाधीन ते अध्यात्म । भूत भावाचे करणे विसर्ग कर्म । बोलिजे ते ।३। अक्षर तेचि आधीभूत । तू पुरुष म्हणोनी तो आधीदैवत । आधी यज्ञ तो मी सर्व देहीवर्तत । आत्मरूपे ।४। अंतकाळी मज स्मरोनी । ते जाती देह त्यजुनी । ते पावती मज लागुनी । येथ संशय नाही ।५।

ज्या ज्या भावे मज स्मरता । होय कलीवर त्यागिता । ते ते पावती कौंतिसुता । सदा सद्भाविक म्हणोनी ।६।

या कारणे मज सर्व  काळ विचारी । मज स्मरोनिया युद्ध करी  । माझे ठायी मन बुद्धि दृढ धरी । तेणे मज पावसी निश्चित ।७।

अभ्यासयोगे करून ।  चित्ता अन्यथा नाही गमन । अर्जुना आणिक न चिंतिता जाण । परम पुरुषाते ते पावती ।८। वेद आणि पुराणे । लोकांसी साक्ष करी जाण । सर्व उदिती कारण  । सूक्ष्माहूनि सूक्ष्म ।९। ऐसा तो अंचित । तपे सूर्य जैसा भासत । तयाहुनी असे अतित । ऐसियाते जो मनी स्मरे ।९।

ऐसा जो अंतकाळी मन चंचळ न करितां । भक्तियुक्त आणि बळी होता । भृमध्यें प्राण ठेवी नेमिता । तो परम पुरुषातें पावे ।१०।

अविनाशपद ज्याते बोलती । तयाते विरक्त होउनी संन्यासी पावती । जे इच्छुनी ब्रह्मचर्य आचरती । ते साक्षेपे सांगेन मी ।११।

नवही द्वारे निरोधुनी । मन हृदयाचे ठायी कोंडुनी । प्राण मस्तकासि नेउनी । योगधारणा धरिजे ।१२।

ऐसे एकाक्षर ब्रह्म उच्चारिता । माझें स्मरण मनी करीता । जो होय देह त्यजिता । तो पावे परमगतीते ।१३। म्हणोनी चित्त नेमणे माझ्या ठायी । ते मज ध्याती नित्य पाही । तयासी मी अर्जुना सुलभ होई । योगयुक्त करुनिया ।१४।

योगयुक्त जैं भोजिजे । मग मग दु:खरूप हा जन्म नाही सहज । ऐसे महात्म्य याचे चोज । ते परम सिद्धि पावेल ।१५।

जे आहेती ब्रह्मलोक आदि करून । तया असे मागुता जन्म । मज पावलिया अर्जुना जाण । पुनरावृत्ति नाहीं ।१६। सहस्त्रयुगपर्यंत । ब्रह्मयाचा एक दिवस होत । तैसा रात्रीचा संकेत । हे अहोरात्र ज्ञानी जाणती ।१७।

अव्यक्त जे असती । ते ब्रह्म दिवशी व्यक्ति येती । रात्री जालिया प्रळय पावती । अव्यक्ताच्या ठायी ।१८।

हे पंचभूताचि सृष्टी । हे लपजे पुढत पुढती । नाश पावे ब्रह्मदेवाचियेे राती । पुनरपी दिवसा उत्पती होय ।१९। या पासाव वेगळा असे ईश्वरु । अव्यक्त नित्य असे पा स्थिरु । सर्व भूतांचा होय संहारु । परि या रूपा नाश नाही ।२०।

ते अव्यक्त अक्षर ऐसे बोलती । तेच ते जाणपा माझी परमगति । तया पावलिया पुढती । जन्म नाहीं ।२१।

तो परम पुरुष जाणावा गा पार्था । तया परम भक्ति पाविजे तत्वता । सर्व भूतां प्रपंच ठायी निरुता । तो विश्वव्यापक असे ।२२।

जे काळी योगी मरण पावोनी जन्मा येती । जे काळी योगी मरण जालिया पुनरावृत्ति न जोती । तो काळ अर्जुना सांगेन तुजप्रति । ऐक आतां ।२३।

दिवस आणि शुक्ल पक्षाचे दैवत अग्नी । षड्मास उत्तरायण जाणोनी । तेथ जाती देह त्यजुनी । ते ऐक्य होती ब्रह्मीं जाण ।२४।

कृष्णपक्षी रात्रीचे दैवत धुम्र । षड्मास दक्षिणायण श्रम । तेथें योगाविण त्यजिति प्राण । ते पावती पुनरावृत्ती ।२५।

शुक्ल कृष्ण या दोन्ही गती । ज्ञान अज्ञान यासी म्हणती । एके गतीपासुनी होय मुक्ती । एकी करुनी पुनर्जन्म ।२६।

या दोन्ही आहे ती श्रुती । यासी जे योगी जाणती । ते मोहाते न पावती । अर्जुना यालागी योगयुक्त होय ।२७। वेद यज्ञ तप आणि दान । त्याचे जे बोलिलें आहे पुण्य । जया असे शुक्ल कृष्ण गतीचें ज्ञान । ते पुण्यपावन परमगतीतें पावे ।२८।

इति श्री मदभगवतगीतासूपनिषत्सु ब्रह्मविध्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे

अक्षरब्रह्म योगो  नाम अष्टमोऽध्याय: ॥८॥

श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

ॐ

# अध्याय नववा

**श्रीभगवान उवाच :**

श्रीकृष्णा म्हणती अर्जुना जाण । हे गुह्य असे परम पावन । तूं माझा भक्त म्हणोन । तुज सांगेन ज्ञान विज्ञानासहित । हे तुवा जाणतलियावरी । ज्ञान होईल अवधारी । दू:खपासाव निर्धारी सुटसी तूं ।१।

राजविद्या राजगुह्य जाण । उत्तम आणि पवित्रपण । हे प्रत्यक्ष धर्म जाणाया योग्य म्हणोन । सुख देतसे नाश रहित ।२।

अर्जुना ये धर्मी जया श्रद्धा नाहीं । तो मज न पवे कही । ये मृत्युसंसारी वर्ते पाही । जीवरुपें ।३।

मी सर्व जगाचे ठायीं । व्यापक अव्यक्त मूर्ति पाही । भूतें सर्वही माझ्या ठायी । मज कोणाचा नाहीं आश्रयो ।४। माझ्या ठायी असती भूतें । ऐश्वर्य माझे निरुतें । भूतातें मी धरितां निश्चिते । आणि भूतावेगळा असे आत्मगुणरुपें ।५।

जैसा वायो आकाशाच्या ठायीं । सर्व व्यापक असे पाही । तैसी सर्व भूतें माझ्या ठायी । असती देख ।६।

श्री सोपानदेवी

सर्व भूतें अर्जुना । माझे प्रकृतितें पावती जाण । कल्पांती साठऊन । कल्पादि सृजी मागुता मी ।७।

प्रकृतीचें बळें करुनी । सृजी मागुते मागुत्यागी । हे सर्व भूतग्राम आदि करुनी । प्रकृतीचे आधीन असती ।८। म्हणोनि कर्मी तयाचियां ।मी न बाधे धनंजया । उदास होउनियां । असक्त नोहे ।९।

प्रकृति माझे अधिष्ठान करून । चराचरातें प्रसवे जाण । या कारणे अर्जुना जन्म मरण । जगासी ।१०।

मूढ लोक मज मनुष्य म्हणती । अज्ञान माझी गती नेणती । परम उत्कर्ष असोनी सर्व भूतीं । मज म्हणती मनुष्य देही ।११।

त्या पुरुषाची आशा निर्फळ । तैसेंचि ज्ञान आणि मन चंचळ । तयाचि गति नाहीं निर्मळ । राक्षसी असुरी मोहें योनि पावे ।१२।

थोर महंत मज मानिती । अर्जुना ते दिव्य प्रकृति । त आश्रित आपुले मनोभावें मज तत्पर होती । मी सर्व भूताचि आदि अवसान म्हणोनियां ।१३।

माझें कीर्तन सदा करी । हें व्रत सदा मनीं दृढ धरी । आणिक भक्ति उपासना विचारी । मज तत्पर होउनी ।१४। किती एक ज्ञानयज्ञे करुन । माझी उपासना करिती जाण । मज भजती एकत्त्वें पृथकत्वें करून । असे विश्वतोमुखी ।१५।

अर्जुना सुलभ होई । माझे ठायी चित्त अर्पी तें ही । मन मत्स्वरुपीं ठेवुनी पाही । योगयुक्त करुनियां । मीचि याग आणि यज्ञ कारण । मीचि स्वधाकार औषधि जाण । मंत्र अज्य आदि करून । हुतही मीच ।१६।

मी जगाचा माता-पिता । पितासह श्रेष्ठ कर्ता । मी ॐकार असतां । ऋग यजु साम वेद मी ।१७।

मी गति आणि पोषकु । समस्ताचा साक्षभूत एकु । आणि अधिष्ठान रक्षकु । श्रेष्ठ तो मी ।१८।

उत्पत्ति प्रळय स्थान । मीच असें सर्वांचें कारण । बीज अव्यय जाण । मीच असे ।१९।

श्री सोपानदेवी

उष्ण तपोनि वृष्टि वरुषे । बळकारें मीचि असे । सोडविणार मृत्यु अमृत्य विशेषें । संत असंत मीच अर्जुना ।२०। तीन वेद ज्ञाने सोमपान करिती । स्वर्ग लोक पावावया याग होमिती । तेणें पुण्यें क्षीणें इहलोक पावती । दिव्य देवभोग भोगुनी । ते पुरुष स्वर्गी वास करिती । क्षीणें पुण्यें मृत्यु लोकां येती । जे धर्मयज्ञ आचरती । तया गमनागमन असे ।२१।

आणिके ठायीं मन न घालिती । माझें चिंतन उपासना करिती । त्यांचा योगक्षेम निश्चिती । मी चालविता होय ।२२।

अन्य देवताचें ठायीं । श्रद्धापूर्वक भक्ति करिती पाही । ते ही माझी भक्ती अन्यथा नाही । परि विधिपूर्वक नव्हे ।२३।

मी सर्व यज्ञांचा भोक्ता । आणि मी सर्वांचा अधिष्ठाता । तत्व माझे नेणती मज न पावता । ते चेवती जाण ।२४। देव पितृ अराधना करिती । आणि क्षुद्र देवताते भजती । ते जन त्या लोकांते पावती । मज भजती तें पावती मातें ।२५।

पत्र पुष्प फळ उदक । मज देती भक्तिपूर्वक । ते मी अंगिकारी एक । ते मज पावे प्रीतीनें ।२६।

अर्जुना जी नाना कर्मे करिसी । जें अग्नीचे ठायी होमिसी । जें तप आचरसी । तें करी मज अर्पण ।२७।

येणें करुनी शुभाशुभ फळ । कर्मबंधनें तुटती सकळ । संन्यासयुक्त होउनि निर्मळ । मज पावशील ।२८।

श्री सोपानदेवी

सर्व भूतांच्या ठायी । मी समबुद्धि असे पाही । मज वैरी मित्र तोही । समचि असे ।२९।

अत्यंत दुराचारी असती । जे एकचित्तें मज भजती । तेचि साधु म्हणिजेती । तेचि भक्त बरवें जाण ।३०।

तो तत्काळ धर्मात्मा होऊनि । निरंतर शांतितें पावोनी । अर्जुना माझी भक्ति जाणोनी । नाश नाही तयासी ।३१।

स्त्री वैश्य शूद्र आदिकरुनी । पापयोनी असोनी । माझी भक्ति केली यांनी । तयासि परमगति जाण ।३२।

या परीस ब्राह्मण पवित्र पुण्यवंत । राजर्षि हे समस्त । माझे भक्त मज पावत । तयासी संदेह नाही ।३३।

माझें ठायीं अंत:करण । भक्तिरुप मज अर्पण । मज उद्देषें याग करून । नमस्कार तो ही मज करी ।

या कारणें हे तू सत्य जाण । हा लोक दुष्टरुप पावेन । हें अनित्य ऐसें जाणोन । माझे भजन करिती ।

माझें चिंतन माझें भजन । माझें करी वाचें नामस्मरण । सदा श्रवणी माझी कीर्ति श्रवण । नित्य करी अर्जुना । करें माझें पूजन करी । चरणे माझी यात्रा तीर्थे करी । मन माझें ठायी धरी । नेमस्त ठेवी मत्स्वरुपीं ।

ऐसी निरंतर करी भक्तिसी । अर्जुना येणे करुनि तूं तरसी । या मोहातें नाशिसी । मज तत्पर होउनिया ।

अर्जुना हा लोक दृष्ट पावोन । या कारणें भक्ति करी जाण । तुझें कल्मष सर्व नासून । पद पावसी परम जें ।

येणें करुनी मज पावसी । मी आत्मा ऐसे जाणसी । योगयुक्त होसी । मज परायण ।

ऐसें गुह्य जाण । अर्जुनाप्रति सांगे श्रीकृष्ण । सोपान म्हणे श्रोतिया लागून । सादरें श्रवण करावे ।३४।

इति श्री मदभगवतगीतासूपनिषत्सु ब्रह्मविध्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे राजविद्या राजगुह्ययोगोनाम नवमोऽध्याय: ||९||

श्रीकृष्णार्पणमस्तु ||

ॐ

# अध्याय दहावा

**श्री भगवान उवाच :**

श्रीकृष्ण म्हणुनी अर्जुना । हें ऐेक परम वचन । तूं सुखसंतोष होऊन । तें सांगेन तुझिया हितालागी ।१।

माझी उत्पत्ती नेणती सुरवर । आणि ऋषिही समग्र । ते नेणती कां म्हणसी याचें उत्तर । यांची उत्पत्ति मजपासूनी ।२।

मी जाण उत्पत्तिरहित । लोक ईश्वर ऐसें म्हणत । ते मूर्ख नव्हे पापरहित । सत्य जाण अर्जुना ।३।

बुद्धि ज्ञान आणि मोह नाहीं । क्षमा सत्य दम शम पाही । सुख दु:ख उत्पत्ति नाश तोही । भय आणि अभय जाण ।४।

अहिंसा समता संतोष । तप दान यश अपयश । हे सर्व भाव उपजती जीवास । ते वेगळाले मज पासाव जाले ।५। महाऋषी आणि चारी मनु । हे जाले मजपासून । सृष्टि जाली याजपासून । म्हणोनि हे लोक माझिया प्रजा ।६। ऐसा मजपासुनी विस्तार । मज तत्वतां जाणे जो नर । तो दृठ योग जाणे निर्धार । येथ नाहीं संशयो ।७।

श्री सोपानदेवी

मी सर्वांचे उत्पत्तिस्थान । प्रवर्तती सर्व मजपासून । ऐसें जाणोनि करिती माझें भजन । ज्ञानी भावयुक्त होउनी ।८।

जो चित्त ज्ञानें मज नेमुनी । परस्परें कथा माझी करुनी । राहे संतोषरूप होउनी । ते पुरुष माझे ठायी रमताती ।९।

ऐसे निरंतर भक्तियुक्त । जे मज भजती प्रीति युक्तीनें अत्यंत । तयासी योगज्ञान देईन बहुत । सत्य जाण पार्था ।१०।

तया उपजलिया अज्ञान अंधकारु । त्यावरी कृपा करी मी करुणाकरु । ज्ञानदीप होऊनी सोज्वळ निरंतरु । अज्ञान नासी तयाचें ।११।

**अर्जुन उवाच :**

अर्जुन म्हणे गा परब्रह्मा । पवित्र परिकरा परम धामा । श्री सत्य पुरुषा शाश्वत या नामा । आदि देवा नित्य प्रभु तूं ।१२।

जें मज सांगितले ऋषेश्वरी सर्वी । देवऋषि नारदादि देवीं । असीत देवळे व्यासादिक स्वभावी । तेंचि मज प्रीति सांगतोसी ।१३।

सर्वही मज तुवां सांगितले । तितुके मज प्रत्यया येउनी साच मानलें । भगवंता तुझे प्रत्यक्ष रूप प्रगटलेलें । तें न कळे दैत्यादानवासी ।१४।

तूं आप आपणा आणसी पुरुषोत्तमा । भूतभावना भूतेषा तुझा न कळे महिमा । देवाचा देव तुज म्हणती परमात्मा । जगाचा स्वामी तूं ।१५।

समस्त देव तुझिया विभूति । आपलिया सांग पा मजप्रति । जे ही विभूति गा श्रीपति । त्रिभुवन व्यापुनी आहे सी तूं ।१६।

योगेश्वरा तुझे चिंतन करिता । तुज कैसिया रीति जाणो गा अनंता । तुझें ध्यान कोणे स्थळी करुं आतां । हे भगवंता सांग मज ।१७।

तुझी विभूती आत्मयोगे विस्तारे करून । वेळोवेळां होय अमृतपान । हें मज सांगा प्रसन्न होऊनी । स्वामी जनार्दना ।१८।

**श्री भगवान उवाच :**

श्रीकृष्ण म्हणती अर्जुनाप्रती । माझिया विभूति बहुत असती । तयामाजी श्रेष्ठ श्रेष्ठ सांगेन तुजप्रती । येरा पाहता अंत नाही ।१९।

तरी अर्जुना अवधारी । मी आत्मा सर्व भूत शरीरी । आदि मध्य निर्धारी । सर्व भूतांसी अंत मीच जाण ।२०। आदित्यामाजीं मी विष्णु । तेजाचे ठायी मी भानु । मरुद्गणांमाजी मरीचि होनु । नक्षत्रांमाजी चंद्र तो मी ।२१। वेदांमाजी सामवेद । देवांमध्येउं इंद्र प्रसिद्ध । इंद्रियांत मन संबंध । भूतांचे ठायीं ज्ञान तें मी ।२२।

रुद्रांमध्ये शंकरु । यक्षरक्षसांमाजीं धरेश्वरु । वसूंमध्ये वैश्वानरु । पर्वतांमाजी मेरू तो मी ।२३।

अष्ट पुरोहितांमाजी बृहस्पती । दलधिपतीमाजी स्कंध म्हणती । सरितामांजी जान्हवी निश्चिती । तो मीच जाण ।२४।

सप्त ऋषीमाजीं भृग ऋषेश्वरु । जपामाजीं एकाक्षरू । यज्ञांमाजीं जप यज्ञेश्वरु । स्थावरांमाजी हिमालय ।२५। वृक्षांमाजी अश्वत्थ प्रसिद्ध । देवऋषीमाजीं नारद । गंधर्वामध्यें चित्ररथ प्रसिद्ध । सिद्धांमाजी कपिलो मुनि ।२६। अश्वांमाजी उच्चैश्वरा वारू । गजांमाजी ऐरावत कुंजरु । हे समुद्रमंथन जाले साकारु । नरांमाजी राजा तो मी ।२७।

शस्त्रांमाजी वज्र । धेनूंमध्ये कामधेनू परिकरु । प्रजन्यामाजी कंदर्प थोर । सर्पामाजीं वासुकी मी ।२८।

नागांमाजीं अनंत । वरूण मी जलचरांत । अर्यमादि पितृगणांत । संयमामध्यें यम तो मी ।२९।

प्रल्हाद मी दैत्यांत । काळ मी अकळि त्यांत । सिंह मी श्वापदांत । पक्षांमाजी गरुड तो मी ।३०।

चळखांमाजीं पवनु । शस्त्रधरांमाजी दशरथ नंदनु । मगरांमाजी मगर होऊनु । सरितांमाजीं सागर मी ।३१।

मी श्रेष्ठामांजीं आदि अंत मध्य स्थान । विद्यांमाजी अध्यात्म जाण । वादामध्यें तत्त्वकथन । तो मी जाण ।३२। मी अक्षरामाजीं ॐकार देव । समसांमाजीं द्वंद्व समासक । मी अक्षय काळ देख । ब्रह्म विश्वतोमुख मीच ।३३।

सर्व भयांमाजीं मरण । उद्भवामाजीं जनन । कीर्ती श्री वाचा हे स्त्रियांमाजीं जाण । स्मरण धारण धैर्य क्षमा तो मी ।३४।

बृहत्साम मासांत । आणि गायत्री छंदांत । मार्गशीर्ष मासांत । ऋतूमांजी वसंत मी ।३५।

छळकांमाजीं द्युत । तेजस्वीयांमाजीं तेज दिप्त । जय व्यवसाय समस्त । सत्त्ववंतामाजी सत्त्व तों मी ।३६। यादवामाजीं वासुदेवो । पांडवामाजीं

धनंजयो । मुनि श्रेष्ठां माजी वेदव्यास देवो । कवीमाजी उशना कवी ।३७।

दंडामाजी दंड जाण । जयवंतामाजीं नीति पूर्ण । गुह्यामाजी मी मौन । ज्ञानवंताचे ज्ञान मी ।३८।

आता तुज बहुत काय कारण । सर्व भूतांचे बीज मी जाण । मजवेगळे नाहीं कोणी स्थान । चराचर मीच जालों ।३९।

माझिया दिव्य विभूति अर्जुना । अंत नाही तया जाणा । हे सांगितले तुज मुख्य करुन । माझा विभूती विस्तार जो ।४०।

जे ऐश्वर्यवंत सत्ववंत देखसी । लक्ष्मी असे जयापासी । अथवा जयवंत जो देखसी । तो जाण अंश माझा ।४१। ज्ञानवंत जे देखसी । सत्वशील जे पाहसी । ते ते माझे अंश परियेसी । अर्जुना जाण ॥

अर्जुना ऐक ज्ञान । तुज बहूत सांगतलिया काय कारण । विश्व जालें मजपासून । एकी अंशे जाणा पां ॥

विभूतीचा विस्तार । सांगतां न कळे निर्धार । सर्वांचा मजमाजी आकार । सर्व मीच व्यापक असे ॥

माझिया दिव्य विभूति । अपार ह्या मजही न कळती । त्यांमाजी काही प्रसिद्ध होती । त्या सांगितलीया ॥

सर्व माझें ठाईं त्रिभुवन । मी तयांचे आदि अंती कारण । मी सर्वांचे अधिष्ठान । अर्जुना सर्वां ठायी देख मातें  ॥ सोपान म्हणे ऐका तुम्हीं । अर्जुनाप्रती योगियाचा स्वामी । विश्वरुप दाखविलें तें मी । श्रवणा निवेदन करीन ॥

इति श्री मदभगवतगीतासूपनिषत्सु ब्रह्मविध्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे विभूतियोगोनाम दशमोऽध्याय: ॥१०॥

श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

ॐ

# अध्याय अकरावा

**अर्जुन उवाच :**

श्री गणेशाय नमः । अर्जुन म्हणे चक्रपाणि । विभूति निरोपिल्या मज कृपा करोनी । जे बोलिलेती तुम्ही आपुल्या वचनीं । तेणे गेला मोह माझा ।१।

जो भूतांचा उत्पत्ति लयी । तो तुम्हापासोनि ऐकिला अनुभवी । स्वामि तू कमलपत्र देवो । ऐकिलें महात्म्या तुझें ।२।

जें तुम्हीं परम ऐश्वर्य सांगितलें ।ते महात्म्य म्यां ऐकिलें ।ऐसें मज मनी उपजलें । जें पाहावे स्वामी रूप तुझें ।३। जरी मज दाखऊ येईल । आणि पाहों येत असेल । तरी ते योगेश्वरा नवल । दाखवी अव्यय रूप तुझें ।४।

**श्री भगवान उवाच :**

श्रीकृष्ण म्हणती पार्था रूप पाहे । तें शतसहस्त्र व्यापक आहे । न वर्णवेची सोये । नाना आकृति असती तया ।५। आदित्य वसु रुद्र पाहे । अश्विनौदेव मरुद्गणरुपी आहे । ऐसें पूर्वी श्रेष्ठीं देखिलें नाही हें ।ते आश्चर्य पाहे अर्जुना तूं ।६।

हें जग अवघे एके ठायीं । असें चराचर व्यापुनि सर्वही । याहूनी आणिक इच्छिसी कांही । ते माझे देहीं पाही पार्था ।७।

इहीं चर्मचक्षु देखो न शकसी मज । मी ज्ञानचक्षु दिव्य देईन तुज । मग योग ऐश्वर्य तें मज । पाहता होय ।८।

**संजय उवाच :**

संजय म्हणे राया। ऐसा वासुदेव बोलोनियां। आपुलें योगऐश्वर्य धनंजया । निज विश्वरूप दाखविता जाला ।९। अनेक नयन मुखें। अनेक अदुभूत रूप देखे। दिव्य भरणें दीप्ति अनेक। आयुधें जयामाजी ।१०।

दिव्यमाळा पितांबर धारण। दिव्य गंधाचे असे लेपण। सर्व अपूर्व पाहतां गहन। दशदिशामाजी सन्मुख ।११। सहस्त्र सूर्य आणि प्रभा शसी । उगवोनि दिप्ती एकसरिसी। तरीच साम्यता कांही घडे त्यासी। ऐसें तेज परमात्म्याचें ।१२।

तयें एके ठायी पाहालें । जग सर्वही वेगळालें । देवाचे देहीं देखिलें। पांडू पुत्रें ।१३।

यानंतर आश्चर्य वाटलें ।अर्जुनास रोमांच प्रगटले । मग दोन्ही अंजुळीपुट जोडुनी केले । नमस्कार विनवणीचें ।१४।

**अर्जुन उवाच:**

पार्थ म्हणे देव तुझे देहीं सर्व देखिलें । आणि ब्रह्मदेव नाभीकमळी बैसलें । रुद्र ऋषि आदिकरुनि नागकुलें । तें पाहिलीं तुझे देही ।१५।

अनेक बहु उदरनेत्र मुखें । तें देखिलीं अनंत परि विशेखें । आदि मध्यांत तो ही नोळखे । ऐसें तें विश्वरुप ।१६। माथा मुगुट गदाचक्र करी । सर्व तेजोमय दीप्ति अवधारी । तैसें दिव्य देखिलें शरीरी । अग्नी सूर्या सारिखें ।१७।

तूं परम आणि अक्षय । या विश्वाचें निदान मूळमय । तूं शाश्वत-धर्म रक्षक अव्यय । आदि पुरुषा मज मानसीं ।१८।

अनंतवीर्य नकळे आदिमध्यांतु । अनंतभुजा शशि सूर्य नेत्रु । प्रज्वलिला अग्नि तैसे तेज देखतु । तुझे तेज विश्वास दोह्यतसं ।१९।

तुझे न देखवें रूप तेज । पृथ्वी आकाश व्यापिलें सहज । दशदिशांत दाटले रूप तुझें । तें देखोनी भ्याले लोकत्रय ।२०।

श्री सोपानदेवी

तुझें ठायी देव प्रवेशती । कित्येक भये करुनि स्तुती करिती । देव तुज स्वास्तिकारें स्तविती । उपनिषदमंत्री ।२१। न कळती रात्रंदिवस । ऋषी वैश्वदेव मरुद्गणा नेणिनेस । सोम गंधर्व अश्विनौ यक्ष राक्षस । देखोनी विस्मये सर्व भय पावले ।२२।

रूप आहे बहु मुखनेत्र । महाबाहू भुजारूप विचित्र । बहु उदरें विक्राळ दाढांचे चरित्र । तेणें लोकांसही मन माझें भय पावले ।२३।

तुझें तेज आकाशीं लागलें । नेत्र विशाळ दिप्तीमान मुख पसरिले । ऐसें तुज देखोनि मन व्यथेतें पावलें । धैर्य आणि शांती न पवे ।२४।

दाढा विक्राळ मुखामाझारी । जैसा अग्नी प्रगटला प्रलयकाळ अवसरी । त्या तेजें दिशा आकळिसी  गा मुरारी । मुख न पाहवें जगन्नाथा ।२५।

धृतराष्ट्राचे पुत्र दुर्योधनादि कौरवो । आणि राजियाचे समुदावो । भीष्म द्रोणादि लोक सर्व । तुझें मुखी प्रवेशती  ।२६।

ऐसें भयानक मुखा माझारी । एक निघती विक्राळ  दाढा भितरी । एक चूर्ण जाले तया मुखांतरी  । दिसती मज ।२७।

जैशा नद्या बहु उदक वाहती  । त्या अवघ्यां सागरीं सामावती ।  तैसे  ये लोकींचे भूपति  । तुझे वदनीं दग्ध होती ।२८।

प्रदीप्त अग्नी भीतरी । जैसा पतंग रिघे अवधारी । तैसें नासीस्तव मुखाभीतरी । तुझिया लोक प्रवेशती ।२९।

तुझा मुख ज्वाळ आणि जिव्हां चळण । तेणें करुनि होतसे सर्व लोकग्रासन । त्या ज्वाळा भीतरी त्रिभुवन । ऐसे उग्ररूप विष्णु तुझें ।३०।

अत्यंत उग्ररूप मज सांगे कवण । देव श्रेष्ठपा तुज नमस्कार होय प्रसन्न । पहिलें रूप पाहावया इच्छ्छितो जाण । तुझी प्रकृती न कळे स्वामी ।३१।

**श्रीभगवान उवाच :**

श्रीकृष्ण झाला बोलता । मी काळ लोकांचा संहार कर्ता । तुम्हा वेगळें करुनि पार्था । ये युद्धीं संहार पावती सर्व ।३२।

या कारणें तूं उठी यश घेई । वैरी जिंकोनी राज्य करी पाही । हे पूर्वीच म्यां मारिले सर्वही । तूं युद्धीं निमित्तधारी ।३३।

भीष्म द्रोण आणि जयद्रथ कर्ण । या वेगळे मारिले सर्व जाण । ते दु:ख न करितां युद्ध केलियाण । रणीं वैरियातें जिंकशील ।३४।

**संजय उवाच :**

संजय म्हणे ऐकोनी वचन देवाचे । कंठ सद्गदित अर्जुनाचे । मग अंजुळीपुट जोडुनि तयातें । नमस्कार करुनि बोलता जाला ।३५।

**अर्जुन उवाच :**

अर्जुन म्हणे नारायणा । तुझी कीर्ति संतोष जाला मना । भयें दशदिशा पळती राक्षस जाणा । नमस्कार करिती सिद्धदिक ।३६।

तूं श्रेष्ठ म्हणोनी नमस्कार करितीं । तू ब्रह्मयासी आदि जगत्पति । जगन्निवासा नाशरहित स्थिति । पंचभूतात्माहूनि पर ।३७।

तू देव पुरुष पुरातन । तूं विश्वासी परम निधान । तुझेन जय उत्कर्ष दीप्तीमान । अनंता तुवां व्यापिलें विश्वरूप ।३८।

वायु आणि वरुण यम । प्रजापति आणि सोम । पितामहा तूं महात्म्य । सहस्त्र नमस्कार तुज पुन: पुन: ।३९।

पूर्व पश्चिमे तुज नमन वंदन । अगणित पराक्रम तुझें वीर्य प्रमाण । तू सर्वांसी पावतोसी म्हणोन । तूं सर्व होसी ।४०।

मी तुज बोलिलों सखा म्हणोनिया । आजी कृष्णा यादवा सखया । तुझा महिमा नेणें स्वामिया । प्रमादु केला ।४१।

विहार आसन शयन भोजन । अव्यक्तासी अविनोद कारण । अच्युता थोर अपराध जाला तेणें । क्षमा करावी स्वामिया ।४२।

तूं पिता चराचर लोकांसी । आणि गुरु पुज्यमान होसी । आणिक अधिक नाही तुज विशेषीं । त्रैलोक्यामाजी ।४३।

या कारणें तुज नमस्कारितो । जैसा सखा सखियास तो । पुत्र पितियासी क्षमा करवितो । तैसी क्षमा करी नारायणा ।४४।

कैं देखिलें नाहीं हें देखोन । हर्ष आणि भय पावलें मन । आता पहिलें रूप दावी प्रसन्न होऊन । देवा जगन्निवासा ।४५।

माथा मुगुट गदा चक्र करी। ऐसा पाहावया इच्छितो अवधारीं ।तें रूप चतुर्भुज मुरारी। प्रगत करी आता।४६।

**श्रीभगवान उवाच :**

देव म्हणे योगबळें करुनि। आपुले रूप दाविले प्रसन्न होऊनि। हे आदिरूप तुज वांचूनी। आणिकी नाहीं देखिलें।४७।

वेद यज्ञ ध्यान दानें । त्रिविधकर्म आचरणें । त्रैलोक्यामाजी कोणे। माझे रूप देखिले नाहीं ।४८।

माझे घोर रूप देखोनी । तेणें मूढभावें व्यथा न धरी मनीं । आतां भय टाकुनी प्राति धरी मनीं । पूर्व रूप पाहे माझें ।४९।

**संजय उवाच :**

संजय म्हणे देव ऐसे बोलोनी । आपुले रूप दाविले मागुत्यानी । अश्वासिला सौम्यरूप होऊनी । भ्यालिया अर्जुनासी ।५०।

**अर्जुन उवाच :**

अर्जुन म्हणे जनार्दन । तुमचे सौम्य रूप देखोन ।आतां झाले समाधान । प्रवृत्तीसी पावलो ।५१।

**श्री भगवान उवाच :**

हें माझें दुर्लभ रूप । तुवां देखिले स्वरूप । हें पाहावया करिती तप । सर्व देव ।५२।

वेद यज्ञ तप दान करुन । हे रूप कोणा न दिसे जाण । तूं वा पोहोनि रूपाचे जालें ज्ञान । आणिक पाहावया कोणी शक्य नव्हे ।५३।

मज पावणें जाणणें देखणें । ते साधारण भक्तीचे गुणें । ऐसें मज तत्वता जाणणें ।
तो भक्त माझा अर्जुना ।५४।
मी उत्कर्ष ऐसे मनी धरी । निर्वैर सर्व भूतामाझारी । मज कारणें तो कर्म करी ।
तो मज पावें पांडवा ।५५।

इति श्री मदभगवतगीतासूपनिषत्सु ब्रह्मविध्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे
विश्वरूपदर्शन योगो नाम एकादशोऽध्याय: ॥११॥

श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

ॐ

# अध्याय बारावा

**अर्जुन उवाच :**

तूं ईश्वर म्हणोनि करी भजन । एकाक्षर अव्यक्त ऐसें जाणोन । तरी दोहींमाजी श्रेष्ठ आहे कवण । ते सांग मजप्रति ।१।

**श्री भगवान उवाच :**

माझ्या ठायीं मन नेमून । श्रद्धापूर्वक नित्य करी भजन । तो भक्त मज पावे जाण । निश्चयेंसी ।२ ।

जें अक्षर आणि अनुर्वाच्य जाण । तें सर्वत्र व्यापक संपूर्ण । अंत:करण गोचर अचळ जाणोन । त्याची उपासना करिती ।३।

इंद्रियसमूह नेमून । सर्वांठायी समबुद्धि करुन । सर्वही तत्पर होऊन । मज पावसी अर्जुना ।४।

अव्यक्ताचे ठायी मन ठेविती । त्यासी क्लेष बहुसाल होती । अव्यक्तोच ठायीं अत्यंत दु:ख पावती । देहवंत ।५। सर्व कर्मे माझ्या ठायीं । व्यापुनी मजयुक्त से माझें ठायीं । मज ध्याती भजती पाही । उपासना करिती ते ।६।

श्री सोपानदेवी

मी उद्धरी तयासी । मृत्य संसारी परियेसी । चित्त माझें ठायीं अर्पिसी । सुखी होई मज मिळोनी ।७।

तुझिया चित्ता नाहीं स्थिरपण । मज पावावया नाहीं समाधान । तरी योग अभ्यास करीपा साधून । येणें मज पावसील ।८।

अभ्यासही जरी न करवे । तरी माझे परिचर्ये कर्म करावें । करितां कर्म मज अर्पुनी भावें । इच्छिली तैसी सिद्धी पावसी ।९।

कर्मही जरी न करिसी । तरी करी योग माझिये आश्रयेसी । सर्व कर्मफल त्यजुनि मानसीं । आत्मरूपीं स्थिर होई ।१०।

पूर्वाभ्यासाहुनी ज्ञान श्रेष्ठ । ज्ञानाहुनी ध्यान वरिष्ठ । ध्यानाहुनी फल त्याग उत्कृष्ठ । आवघीयाहुनी शांति अधिक ।११।

सर्वभूती द्वेष नाहीं । ममता अहंकार नाहीं देही । सुखदु:ख सम शांतीचे ठायी । स्थिर असे ।१२।

योगी निरंतर सुखेंसी । आत्मा जिंतोनी दृढ निश्चयेसी । मन बुद्धि माझे ठायीं अर्पिसी । तो भक्त मज प्रिय ।१३। जया पासुनि लोक नव्हती दु:खी । लोकापासाव आपण असे सुखी । हर्ष भय क्रोध नेघे विशेखीं । तो भक्त मज प्रिय ।१४।

जया अपेक्षा नसें कांही । सदा शौच असोनी दक्ष पाही । उदासीन असे व्यथा नाहीं । सर्व त्यागी तो भक्त मज प्रिय ।१५।

जो सर्वेश उदार । तोचि शांतींचे घर । मी तयाचा घरटीकार । निश्चयेसी जाण पां ।१६।

जया नाहीं हर्ष ना द्वेष । शोक न करी कांक्षेचे सुख । शुभाशुभ त्यागी देख । तो भक्त मज प्रिय ।१७।

जया शत्रु मित्र समान । नाहीं मान अपमान । शीत उष्ण सुख दु:ख समान । जय असक्तता नाहीं ।१८।

तुल्य निंदा स्तुति मौनी । अल्पेसंतुष्ट सदा असोनी । न राहे एकें ठायीं बुद्धि स्थिर करुनी । ऐसा नर तो प्रिय मज ।१९।

हे उपविती धर्मातें अमृत । जें बोलिलो त्याची उपासना करीत । भक्ति युक्ति मज तत्पर होत । ते भक्त मज प्रिय ।२०।

इति श्रीमदभगवदगीतासूपनिषत्सु ब्रह्मविध्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे भक्तियोगो नाम द्वादशोऽध्याय: ॥१२॥

श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

ॐ

# अध्याय तेरावा

**अर्जुन उवाच :**

अर्जुन म्हणे देवा । या प्रकृतिपुरुषाचिया भावा । क्षेत्र क्षेत्रज्ञ निवडावा । ज्ञान ज्ञेय तुझेनी मुखें इच्छितो ।

**श्रीभगवान उवाच :**

श्रीकृष्ण म्हणे पार्था परियेसी । देह हें क्षेत्र म्हणावें यासी । हे जाणें जो नेमेंसी । तो क्षेत्रज्ञ म्हणावा ।१।

क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ दोन्ही । या दोहींचा जाणता म्हणोनी । तो मज मानला म्हणोनी । तूं जाण अर्जुना ।२।

तें क्षेत्र कैसें बोलिजे । आणि क्षेत्रज्ञ ऐसें कासया म्हणिजे । या दोन्हींचा निवाड सांगेन वोजे । तें ऐकें आतां ।३। ऋषि बहुती तुज सांगितलें । वेदविधि बोलिले वेगळालें । उपनिषदीं निश्चयें केले । हें सत्य जाण ।४।

महाभुतें आणि अहंकार । बुद्धि अव्यक्त असे स्थिर । आकार इंद्रियांचा भार । पंच विषय जाण ।५।

श्री सोपानदेवी

इच्छा द्वेष सुखदुःख । देह चेतना वृत्ति देख । इतकियातें क्षेत्र म्हणती एक । हे षड्विकार सांगितले ।६।

अहंकार नाहीं दंभ न धरी । हिंसा न करी शांति आर्जव करी । गुरुचे ठायीं भजन अंतरी । पवित्रपणें अंत:करण निरोधि पां ।७।

जो सर्वत्रेसी सुरंग । अखंड रंगे रंगला सुभग । अंतरी कांही न धरी उद्वेग । तोचि भज आवडे जाण ।८।

इंद्रियांचे ठायीं वैराग्य सुख । दुसरा अहंकार देख । जन्म मरण व्याधि जरा रोग दुःख । याचें ठायीं दोष दर्शन ।९।

असा असाधारण योगें करूनी । दृढ भक्ति लागुनी । करी निस्पृह देश सेउनी । प्रीति नाहीं लोकांच्या ठायीं ।१०। अध्यात्म ज्ञानें नित्य तत्पर होणें ।तत्वज्ञान विषयातें जाणोनि नेमणें । ते अनादि परब्रह्म खुणें । हें सत्य असत्य नव्हती यानें केलें तें ज्ञान ।११।

जाणिजे ते तें ज्ञान सांगणे । जाणितलिया पाहिजे मोक्ष जाणणें । ते अनादिपरब्रह्म खुणें । ते असत्य नोव्हेती ।१२।

सर्वत्र हात पाय दिसती । शरिर आणि तया मुखें असती । कर्ण सर्वत्र भासती । ऐसा व्यापुनि सर्व लोकीं असे ।१३।

सर्व इंद्रिय गुण भासती । परि इंद्रियें तये ठायीं नसती । अशक्त नसोनि सर्व भूतीं । निर्गुण होउनि गुण भोगी ।१४।

असें भूती आंत बाहेर । चर आणि अचर होय । सूक्ष्म म्हणोनी जाणावयास ये । दुरी असोनी जवळी तो ।१५। भूतांचे ठायी अविभक्त असे । परि तो विभक्तपणें दिसे । भूतांचे पोषण करितसे । ग्रासी आणि उत्पत्ती कारणें ।१६।

जे ज्योती मध्यें ज्योती । अज्ञान हा परम बोलती । ज्ञानगम्य ज्ञानयज्ञ म्हणती । सर्व हृदयी व्यापुनी असे ।१७। ऐसे क्षेत्रे आणि ज्ञान । ज्ञेयें सांगितले साक्षेपें करून । हे माझा भक्त जो जाणे । माझा प्रसाद तो पावे ।१८।

असतां प्रकृतिपुरुषाची स्थिति । हे उभय वर्ग अनादि असती । विकार आणि गुण प्रकृतीपासुनी निजपती । ऐसें जाणावें ।१९।

या कारणें कर्तृत्व । या तिहींचे प्रकृतिकारत्व । सुख दू:ख भोगतृत्व । ऐसें बोलिजे ।२०।

पुरुष प्रकृतिमाजी असोनि । भोगी योनी प्रकृतीचेनि गुणी । असे गुणसंगें करूनि । नाना योनी जन्मे तो ।२१। पाहतां अनुमोदन देतां । ईश्वर पोषक आणि भोक्ता । तो परमात्मा म्हणिजे तत्वता । हे ही परम पुरुष तो ।२२। प्रकृति पुरुष आणि गुण । ऐसें जयासी ज्ञान । तो सर्व प्रकारी संसारी असोन । पुनरपि जन्मा न ये ।२३।

ध्यानें आत्मा देखती कोणी । कोणी देखती आपणा आपणीं । कोणी सांख्यं योगें करुनी । कोणी एक परब्रह्म ऐसें ।२४।

आणि जे ज्ञानी असती । गुरुपासुनी उपासना करिती । ते मृत्यु संसारी तरती । श्रुतिपरायण ।२५।

जितुकें आकारासी आलें । स्थावर जंगम बोलिलें । तितुके क्षेत्र क्षेत्रज्ञापासूनि जन्मलें । म्हणोनि तोचि तू जाण अर्जुना ।२६।

सकळ भूतांमाझारी । ईश्वर राहे निरंतरी । भूतें नासुनी आपण अविनाश निर्धारी । ऐसें जाणे तोचि शहाणा ।२७।

परमात्मा सर्वत्र सम आहे । ऐसे जो समबुद्धि पाहे । तो आत्महत्यारा नोहे । परम गति तो पावे ।२८।

अवघीं कर्मे आणि क्रिया । जाणावें प्रकृती पासुनिया । ऐसें पाहे आपण अकर्ता होउनियां । तेचि पाहणार ।२९। म्हणोनी वेगळालीं सर्व भूतीं । आत्मयातें एकत्व देखती । जें बोलिलें विस्तारस्थिति । तें ब्रह्म पावती निश्चयेंसी ।३०।

ऐसा तो निर्गुण आघात नाहीं । परमात्मा अव्यय पाही । संसारी असोनी कांही । न करी न लिंपे ।३१।

जैसे सर्व घटीं सूक्ष्म होऊनी । आकाश न लिंपे जाण । तैसा आत्मा सर्व भूतीं असोन । अलिप्त पैं ।३२।

जैसा सूर्य एक । सकळ लोक प्रकाशक । तैसा सर्व देहीं भासक । परमात्माचि अर्जुना ।३३।

ऐसे क्षेत्र क्षेत्रज्ञाचे भेद । जो देखे ज्ञानचक्षु करुनी शुद्ध । पंचभूते आणि प्रकृति क्षोम जाणोनि बद्ध । तो परम गति पावे ।३४।

इति श्री मदभगवतगीतासूपनिषत्सु ब्रह्मविध्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे क्षेत्रक्षेत्रज्ञयोगो नाम त्रयोदशोऽध्याय: ॥१३॥

श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

ॐ

# अध्याय चौदावा

**श्री भगवान उवाच :**

मागुत्यानें सांगे परम । ज्ञानाचें ज्ञान उत्तम । सर्व ऋषी जें ब्रह्म । जाणोनि सिद्धि पावले ।१।

हे ज्ञान जिहीं आश्रयिलें । ते माझे समानत्व पावले । उत्पत्ति काळीं ही नाहीं उपजले । नाशकाळीं नाश नाहीं ।२। प्रकृति माझे गर्भी ध्यान स्थान । तेथें करी मी बीजारोपण । तेथूनी सर्व भूतांचे जनन । होतसे गा भारता ।३।

सर्वां ठायी कौंतिसुता । ज्या ज्या व्यक्ति होती याची मात । प्रकृति आणि मी असे पिता । निक्षेपकर्ता बीजाचा ।४।

सत्व रज तम हे तिन्हीं गुण । झाले असती प्रकृतिपासून । अर्जुना शरिरासी बांधोन । नाश शून्य सुखाचें ।५।

ज्या सत्वगुण निर्मळ । या लागी निशा प्रकाशिल । सुखसंगी बाधे प्रबळ । आणि ज्ञानसंगी गा अनाध्या ।६। इच्च्छात्मक जबर जो गुण । होतो तृष्णा संगापासोन । तो बाधे कर्म संगे करून । पुरुषातें गा अर्जुना ।७।

अज्ञानी जाला तमोगुण । सर्व जीवासी मोह करी जाण । विस्मरण आळस निदेण । तो बांधे गा अर्जुना ।८। सुखेसी योग करी सत्त्वगुण । कर्मेसी भारता रजोगुण । ज्ञान लोपोनी तमोगुण । विस्तारेसी योग करी ।९।

रज तमातें पराभऊन । सत्त्वगुण वाढे गा जाण । रज होय सत्त्वतम मोडून । सत्वरजासी तम होय ।१०।

सर्व इंद्रियासी शरिरीं । प्रकाश आणि ज्ञान होय जरी । सत्त्वगुण वाढला तरी । ऐसे निश्चित जाणिजे ।११।

विषय लोभ आणि प्रवृत्ति । कर्माचा आरंभ आणि शांती । इच्छा हे भारत श्रेष्ठ होती । वाढलिया रजोगुण ।१२। अस्फूर्ति आळस विसर । आणि मोहो गा क्रोध क्रूर । तमोगुण जालिया फार । हे इतुके होत असे ।१३।

जेधवा उदयाते पावे सत्त्व । तेधवा जो मृत्यु पावे जीव । तयासी स्वर्गादिक ठाव । राहावया प्राप्त होय ।१४। रजोगुण असतां परीजे । तरी मनुष्यामाजी जन्मिजे । तमोगुणें देह सांडिजे । तरी होय वृक्षादि ।१५।

कर्म केलें जें सांग सकळ । सात्त्विक श्रद्धा त्याचें फळ । रजोगुण दु:ख केवळ । अज्ञान ते तमोगुण ।१६। सत्त्वगुणास्तव होय ज्ञान । लोभ होय रजोगुणें करून । विस्मरण मोह आणि अज्ञान । हे होती तमोगुणास्त्व ।१७। सत्त्वीं राहिलें जाती स्वर्गास । मनुष्यलोकी राहती राजस । अध:पतन पावती तामस । नीच गुणीं जे राहिले ।१८।

गुणाहुनी आणिक नाही कर्ता । ऐसा द्रष्टत्वें जो पाहतां । आपणास निर्गुण जे जाणतां । माझे मिळणी जो मिळे ।१९।

देहींहूनी जे झालें त्रिगुण । त्यातें देही अति क्रमून । जन्म मृत्यू जरापासून । सुटोनि मोक्ष तो भोगी ।२०।

**अर्जुन उवाच :**

अर्जुन म्हणे स्वामी कृष्णा । कवण लक्षण या त्रिगुणा । उल्लंघिलेले जाणिजे या जना । काय त्याचा आचार । कवण कवण गा साधनी । त्रिगुण उल्लंघिले गुणी । ऐसा प्रश्न अवधारोनी । श्रीकृष्ण बोलता झाला ।२१।

**श्री भगवान उवाच :**

पांडवा प्रकाश आणि प्रकृति । मोहो आणि ज्या गुणवृत्ति । द्वेष न करी तरिया पावती ।    न पावता इच्छा न करी ।२२।

उदासिनाचे परी जो राहत । गुणीं करुनि जो न चाळिजेत ।  गुणचेष्टातित ऐसें मानीत । राहे परी चळेना ।२३। आत्मनिष्ठ सुख दु:ख सम  । तुल्य मृत्तिका पोषण हेम । धीर जो प्रीयी अप्रीयी सम । सारखी ज्यासी स्तुति निंदा ।२४।

तुल्य ज्यासी मानापमान । मित्र वैरी ज्या समान । आरंभ मात्रहि त्यजून । तो बोलिजे गुणातीत ।२५। अव्यभिचारि भक्तियोगेन । माझे जे करितसे सेवन । तों

या गुणाते क्रमून । ब्रह्म सायोज्य पावे तो ।२६। अविनाशिया मोक्षाची । सदा वर्तमान धर्माची । एकांत सुख ब्रह्माची । मीच असे परम ।२७ ।

इति श्री मदभगवतगीतासूपनिषत्सु ब्रह्मविध्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे गुणत्रयाविभागयोगो नाम चतुर्दशोऽध्याय: ॥१४॥

श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

ॐ

# अध्याय पंधरावा

**श्री भगवान उवाच :**

ऊर्ध्वं मूळ आहे ज्या वृक्षाचे । अध:शाखा विस्तार ज्याचें । सत्य छेद वेदरूप तयाचें । परी त्यातें जाणे तोचि ज्ञानी ।१।

अध उर्ध्व विस्तारलिया शाखा । गुणखांदिया विषय पल्लव देखा । कर्म मुळें अधो गेलिया ऐका ।      मनुष्यलोकीं ।२।

तयाचे स्वरुप न कळे कैसें । आदि अंत अधिष्ठान दिसे । तो दृढ मूळ अश्वत्थ असे । असंग शस्त्रें तोडावा ।३।

यापरी पदमार्ग विचारिजे । तो पावलिया पुन्हां जन्म न येईजे । म्हणोनि तया पुरुषा पाविजे । उत्कर्ष पुण्यें करुनियां ।४।

गेलिया मान मोहो जयाचा । विषयसंग त्यजुनि आरंभ नित्य अध्यात्माचा । कामनासहित तोडी संग सुखदु:खाचा । तें परम पदासी पावती ।५।

सूर्य तेज चंद्र प्रभा । अग्नीं दीप्ती नाहीं शाश्वत नभा । माझे तेज धाम अनादि शोभा । नाशरहित सर्वकाळ असे ।६।

सर्व भूतीं  माझा अंश जाण । मी असे अवघे व्यापून । साच इंद्रियमन आदि करून । प्रकृतीते असे व्यापकपणीं  ।७। ये शरीरातें  धरिती । वागविती घेऊनि जाती । जैसा वायो परिमळाचें वृत्ति । तयापरि असे ।८।

श्रोत्र चक्षु त्वचा जिव्हा घ्राण । यासी मनची अधिष्ठान । झळक विषयाचें  सेवन । तेणेचिं होय ।९।

असणें  अथवा जाणें । गुणासाहित भोग भोगणें  । ज्ञानियासी लागे देखणें  । मूर्ख ते काय देखती  ।१०।

योगी आपुले ठायीं  । राहोनी राहाती पाही । आत्मा जयाधीन नाहीं  ।  तीं अज्ञानें न देखती  ।११।

जें सूर्य तेज जगीं भासे । जें चंद्र तेज अग्नीचें ठायी दिसे । तें तेज माझेनि प्रकाशे ।
ते तेज जागीं भासे । तें माझें तेज जाण ।१२।

पृथ्वीतें प्रवेशुनी । आत्मबळें भूतातें धरोनी । रसस्वरूप चंद्र होउनी । औषधि
तेणें पोषिता होय ।१३।

मी वैश्र्वानर होऊनी । असे प्राणियाचे देह अश्रउनी । प्राणापान समायुक्त करूनी ।
मी पचवी असें चतुर्विध ।१४। मी प्रविष्ट आहे सर्वांचे हृदयी । मजचि पासुनी
स्मृति ज्ञानही । वेद जाण नर तोही । माझेंनीचि अंशे ।१५।

लोकीं पुरुष मी जाण । एकाक्षर दुसरा क्षर म्हण । सर्व भूतीं क्षर प्रमाम ।
अविनाश तें अक्षर ।१६।

श्री सोपानदेवी

उत्तम पुरुष तो आणिक । परमात्मा बोलिजे तो एक । व्यापक धरी त्रैलोक्य । अव्यंग ईश्वर जो । १७ ।

या कारणें  मी क्षराहुनि अतित । अक्षराहूनी उत्तम म्हणिजेत । मी वेद आणि लोकांत । पुरुषोत्तम नाम ऐसें  मज ।१८।

जे ज्ञानी होउनी असती । आणि पुरुषोत्तमा जाणती । सर्व जाणोनी मज भजती । सर्वभावें अर्जुना ।१९।

हे गुह्य उत्तम शास्त्र । जें सांगितले अति पवित्र । हें जाणोनी होती बुद्धिमंत नर । ते कृतकृत्य जाण भारता ॥ संजय म्हणे रायासी । ऐसे देव सांगती अर्जुनासी । ते तूं परिसतु आहेसी । एक भावें जाण ॥

धृतराष्ट्र म्हणे संजया । या गोष्टीं कासया सांगती वाया । जय कोणासी ते सांग लवलाग्या । चासी मज कारण नाहीं ॥

संजय म्हणे हा म्हातारा । मोहें चेतलासे पुरा । परंतु आजि व्यासकृपेनें पैलपारा । पावलों मी ॥

धन्य गुरुकृपेचें देणे । तया संजया कारणें । जे ब्रह्मसुख वाखाणणें । नित्य वकृत्व तयाचें ॥

सोपान म्हणे पाही । गुरुकृपा मज प्राप्ती झाली तेही । बोलिलो तुम्ही संतमाई । परिस तूं आता ॥

श्री सोपानदेवी

अपत्य बोबडा बोली । रंजवी आपुली माउली । तेवी मी लडिवाळपणें विनवी । तुम्हांप्रति ॥

वक्ते म्हणती राही । हे दिनवणें न लागे कहीं । तूंते कथे चित्त देईसादरे सांगे ॥

इया संताचिया वचना । आनंद जाला सोपाना । पुढें ऐका सादर श्रवणा । तुम्ही संत सोयरे श्रद्धाळु ।२०।

इति श्री मदभगवतगीतासूपनिषत्सु ब्रह्मविध्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे पुरुषोत्तमयोगो नाम पंचदशोऽध्याय: ॥१५॥

श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

श्री सोपानदेवी

ॐ

# अध्याय सोळावा

**श्री भगवान उवाच :**

श्रीकृष्ण म्हणे ज्ञायोगाची स्थिती । दान दम तप म्हणिजे ती । स्वाध्यायें अर्जाव करितो । सर्वगुणें सर्वासी देती अभय ।१।
हिंसा न करी सत्य बोले क्रोध न करी । शांति त्याग असोनी दान करी । सर्वत्र मार्दव दयाधारी । लज्जा असोनी चपळता हाकी ।२।

सत्व क्षमायुक्त बुद्धि । द्रोहो स्वाभिमान नाही चित्तीं । हे जयाची दैवसंपत्ति । अस्थित जाणावा ।३।

दंभ दर्पाभिमान । क्रोध आणि निंदा कठिण जाण । हे अज्ञानाचे गुण । ऐसा तो असुरीसंपत्ती पार्था ।४।

दैव संपत्ति मोक्ष होय । असुरी संपत्ती बांधोनी जाय । तूं दैवीसंपत्ति होय । म्हणोनि झणी शोक करुं नको ।५।

ये लोकीं भूत सृष्टी दोन्ही । दैवी आणि असुरी योनी । दैवी सांगितली विस्तारें करुनि । असुरी आतां ऐके पार्था ।६।

प्रवृत्ति आणि निवृत्ति । नेणती यासी असुर लोक म्हणती । शौच आणि आचार नाही चित्तीं । सत्य ते जाणोचिना ।७।

त्रैलोक्य असत्य प्रतिष्ठीती । ईश्वर नाही ऐसे बोलती । परस्परें स्वभावें होती । कामना करूनियां ।८।

ऐसी दृष्टि स्वार्थी गुंतोनी । अल्प बुद्धि आत्मज्ञानि होऊनी । उग्र कर्में आचरोनी । क्षया करणें करिती जगीं ।९। देहीं अभिळासाचा भरू । दंभमान मदाचा संचारू । अभिलासे लागे करू । अशुचि वृत्ते वृत्तें ।१०।

प्रळयकाळवरीं चिंता करी । प्रेम विषय भोगावरी । इतकेही मनीं धरी । अपर मी शाश्वत जाणोनिया ।११।

सत्व आशा पाशें बांधलें । काम क्रोधें व्यापिलें । अभिलासें आचरो लागले । अन्याय कर्मे ।१२।

लाभ जाला आजी मज । मनोरथ पावले सहज । आजी सर्व हे आहे मज । मागुतें धन आणिक होईल ।१३।

आपुले वैरी म्यां मारिले । बहुतेकांचे प्राण घेतले । समर्थ मी मज भोग जाले । मी सिंधु बळकट सुखी ।१४। लोकामाजी मी थोर । आज्ञा देऊनी मी होईन सुरवर । कोणी न राहे मज समोर । ऐसा अज्ञाने झांकोळला ।१५। ऐसा मोहजळे वेष्टुनी । अनेक चित्ते भ्रमोनी । काम भोगतें इच्छुनी । निरयी पडिले ते जाण ।१६।

सर्वहो म्यां केले । ऐसे स्तब्ध घनें मातलें । त्यांनी जरी सर्व यज्ञ केले । तरी ते विधीविण दंभ करिती ।१७। अंहकार बळ दर्पें करुनी । काम क्रोध आश्रवुनी । मी परमात्मा असोनी । तोही मज द्वेषील ।१८।

ते ही मज द्वेषीलें । तेणें अधर्म बोलिलें । तेणें पाप ते जन्मलें । असुर योनी ।१९।

ते असुर योनी जन्मती । जन्मो जन्मी मज अंतरती । तया होय अधोगती । कौतिपुत्रा ।२०।

आत्मयासी नासावया कारणे । द्वारें असतीं तीन । काम क्रोध लोभ जाण । हे तिन्ही त्यजावे ।२१।

हीं अज्ञानाची द्वारें । त्याजुनियां सकळ कर्म आचरे । तो आणिक न पावे निर्धारें । परागति तयासी ।२२।

शास्त्र वित्पन्न टाकोनी । जो वर्ते आपुले इच्छे करुनी । तया सुखशुद्धि नाहीं म्हणोनी । परम गति न पावे ।२३। या कारणें शास्त्रप्रमाण करणें । कार्य करू नये तें विचारणें । शास्त्र प्रमाण जें वर्तणें । तेणे कर्म करावयास योग्य होसी ।२४।

या कारणें पार्था । शास्त्राधारें वर्ततां । बाध नाही कर्म आचरतां । शास्त्राधारें करुनिया ।२५।

इति श्री मदभगवतगीतासूपनिषत्सु ब्रह्मविध्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे
दैवासुरसंपत्तियोगो नाम  षोडशोऽध्याय: ॥१६॥

श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

ॐ

# अध्याय सतरावा

**अर्जुन उवाच :**

अर्जुन म्हणे श्रीकृष्ण नाथ । शास्त्र विध टाकुनि भक्ति योगें भजतां । त्याची निष्ठा कोण सांग आतां । सत्त्व रज तम या तिहींमाजी ।१।

**श्री भगवान उवाच :**

देव म्हणती अर्जुना । श्रद्धा हे त्रिविध जाण । सात्विक राजस तामस सांगेन । तें ऐक तू ।२।

सत्त्वरूप श्रद्धा आहे सर्वांशी । परि जयाची भक्ति जैसी तैसी परियेसी । जो पुरुष बहुत श्रद्धायुक्त देखसी । तो तद्रूप जाणावा ।३।

सात्त्विक देवातें यजिती । राजस यक्ष राक्षसा भजती । प्रेत भूतें पूजिती । ते तामस जाणावे ।४।

अशास्त्रविहित घोर । जो जप करी अविचार । अहंकार भजे अपार । काम क्रोधें बांधलासे ।५।

शरीरामध्यें पंचभूतें पिडिती । तेथे आत्मा मी मज क्लेश होती । ऐसे जे पुरुष असती । ते असुर जाणावे ।६।

सर्वां जीवास आहार । त्रिविध आवडती प्रकार । यज्ञ तप दान अपार । याचे भेद ऐक तूं ।७।

सत्त्वें आयुष्य बळ आरोग्ये । वाहती सुखप्रीतिचेनी योगे । गोल्यबरवे आहार विहित आंगे । हे आवडे सात्त्विकासी ।८।

कडू आंबट तीक्ष्ण । कठिण कोरडे अति उष्ण । अन्न हे राजसा आवडे जाण । दू:ख शोक होती तया ।९।

अमंगळ चविहीण । शिळें आंबलें  विटलें जाण । उच्छिष्ट आणि अमेध्य भोजन । हे तामसाचे जाण गुण पां ।१०। वेद शास्त्रीं  देखिलें तें करी । तो यज्ञ फळाची इच्छा न धरी । विहित म्हणोनि करी । तो समाधिस्त सात्त्विक ।११।

दंभास्तव करणें । मनीं फळ इच्छिणें । ते भारता ऐसें भजणें । तो राजस जाणावा ।१२।

वेदशास्त्र विरहित । मंत्र दक्षिणारहित । श्रद्धा नाहीं आणि करीत । तो तामस बोलिजे ।१३।

देव गुरू ब्राह्मण । तयाचे भक्तिसह पूजन । ब्रह्मचर्य अहिंसा जाण । हें तप सात्विकाचें ।१४।

पराचे अनहित न बोले I वेद पठणीं मंत्रीं आथिले I उद्वेगरहित बोले I तें तप बोले वाचिक I१५I

मन निश्चळ शांत I कहीं न बोले असत्य I आत्मशुद्ध असे निग्रहित I हे तप मानसिक I१६I

असती प्रीति सहित I नर त्रिविध तप करीत I जें फळ इच्छा न धरती I ते सात्विक बोलती I१७I

दुसरियातें दुखवी I आपण पूजा भावी I दंभेसहित तप दावी I ते राजस जाणावें I१८I

अज्ञान आपण आंगीकारी ।प्राण पीडा तप करी । दुसरियाते असत्कारी । ते तप तामस ।१९।

यथाशक्ति दान देणें । अनुपकारी भजणें । देश काल पात्र विचारणें । हे सात्विक बोलिजे ।२०।

जो परोपकारी भजे । फळ इच्छा न करिजे । दुसरिया तें कळिजे । ते दान राजस ।२१।

आदेश काळे करी । भलतियांते भज जरी । ज्ञान नेणता सत्कारी । ते दान तामसाचें ।२२।

ॐ तत्सदिति उच्चारणें । हे ब्रह्मयाचें बोलणें । येणें करी वेद यज्ञ ब्राह्मणे । निर्माण जाले पाही ।२३।

या करणें ऐसें बोलणें । यज्ञ दान तप क्रिया करणें । हे ब्रह्मवादियाची खुण । जाण हेची ।२४।

मोक्षाची इच्छा जो करी । तो फळाची इच्छा न धरी । यज्ञ दान तप नाना करी । तो पावे परम पदाते ।२५। भक्ति आणि सद्भाव । तेथै असे सत्कर्माचा प्रभाव । तो उच्चारितां ठाव । ॐ तत् सत् ब्रह्म जाण ।२६।

म्हणोनि तप दान यज्ञ स्थिति । तो सत् शब्द बोलिजेती । येणें संबंधे कर्म करिती । तो सत् शब्द जाणावा ।२७ ।

श्री सोपानदेवी

श्रद्धा नसतां होम दान । तप आणि कर्म कारण । आसक्त शब्द जाण । इहलोकीं परलोकीं नव्हें बरवें ।२८।

इति श्री मदभगवतगीतासूपनिषत्सु ब्रह्मविध्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे श्रद्धात्रयविभागयोगो नाम सप्तदशोशोऽध्याय: ॥१७॥

श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

ॐ

# अध्याय अठरावा

**अर्जुन उवाच :**

श्री गणेशाय नमः | अर्जुन म्हणे जी नारायणा । मी इच्छितों जी तत्त्वलक्षणा ।
त्याग आणि संन्यास कवणा । हें वेगळे करुनी सांगावे मज ।१।

**श्री भगवान उवाच :**

देव म्हणे अर्जुना परियेसी । जो कामनेसहित टाकी कर्मासी । तया म्हणती संन्यासी । योगीजन महानुभव ।२। एक दोषरूप म्हणोनी कर्म त्यजिती । एक म्हणती तप दान यज्ञ हे कर्माची गति । ऐसे पां सांगती । परि कर्म त्यजूं नये ।३। तो त्याग निश्र्चयेंसी ऐक । अर्जुना जाण हें थोर कौतुक । तो त्यागी त्रिविध लोक । आचरताती देखा ।४।

यज्ञ दान तप कर्म न टाकावें । कर्मे निरंतर अवश्य करावे । यज्ञ दान तप भावें । तो ज्ञानियासी पवित्र करीं ।५। म्हणोनि फळसंग त्यजुनी । नित्य कर्म आचरोनि । हे निश्र्चित तूं जाण मनीं । हे उत्तम मज मानलें ।६।

नित्य कर्में करावी । आणि कर्में करितां जो दु:हावी । अज्ञानासत्व त्यजी स्वभावी । तो तामस बोलिजे ।७। दु:खरूप आहे कर्मसंग । शरीर क्लेशभयें करिती त्याग । त्यासी म्हणती राजयोग । येणें त्याचें फळ नाही ।८। कर्म अवश्य म्हणोनी नित्य करी । संग फळाची अपेक्षा न धरी । ऐसा जो त्याग करी । तो सात्त्विक बोलिजे ।९। असत्कर्माचा द्वेष न करी । सत्कर्मी आसक्ति न धरी । ज्या त्यागीयासी सत्त्वगुणी निष्ठावरी । तो प्रज्ञावंत नि:संदेह होय ।१०।

पुरुषासी अवघी कर्मे अवश्यक । समस्त कर्मे त्यागी तो ही अयोग्य । जो न धरी असक्तीचा पांग । तो त्यागी बोलिजे ।११।

अनिष्ट इष्ट आणि मिश्रित । ते त्रिविध कर्माचे फळ त्वरित । त्याग न करितां हे पावेल सत्य । संन्यासी न पवे निश्चित जाण ।१२।

याच कारणें ऐक मजपासूनी । अर्जुना सावध होऊनी मनीं । सांख्य मति बोलती म्हणोनी । हे सर्व कर्माचे सिद्ध कारण ।१३।

अधिष्ठान तें शरीर । कर्ता तो आत्मा परिकर । करणें चेष्टा इंद्रिय व्यापार । पांचवे अदृष्ट जाण ।१४।

शरीर वाचा मनाच्या युक्ती ।प्राणि जे पा आचरती । बरवें अथवा वाईट करिती । ही पांच कारणें कर्माचीं ।१५। ऐसा असतां केवळपणें । कर्ता म्हणोनी देखे दुर्बुद्धिकरून । तो दुरात्मा मूर्ख जाण । नेणे कांहीच म्हणोनिया ।१६। ज्या

अहंभाव नाहीं । मी कर्ता हे बुद्धि न लिंपे कहीं । तो लोकांते मारील जऱ्ही । तो मारणार नव्हे कदा ।१७। ज्ञान ज्ञेय आणि ज्ञाता । कर्म कारण आणि कर्ता । ध्येय ध्यान आणि ध्याता । हा संग्रह कर्माचा ।१८।

ज्ञान कर्म आणि कर्ता । हे वेगळाले भेद गुणाचे देखा । तेथें त्रिगुणाची असे संख्या । तेथें बोलिजे तें ऐक ।१९।

सर्व भूतांचे ठायी । अव्यय भाव देखे पाही । वेगळाले पदार्थ एके ठायीं । हें ज्ञान सात्विक ।२०।

वेगळालें भावें देखें । ऐसी नाना भावाची वृत्ति दिसे । सर्व भूतांचे ठायी दृष्टि असे । तें ज्ञान राजस जाण ।२१।

जे कार्य तें थोडे करी । अभिमान बहुत कर्माचा धरी । अत्यंत राहटीची भरोवरी । हें ज्ञान तामसाचें ।२२।

फळ रहित नित्य कर्म करी । राग द्वेष न धरी । फळ उद्देशें कर्म न करी । तें कर्म सात्विक बोलिजे ।२३।

काम्य कर्म करणें । अहंकार दंभ धरणें । बहु सायास आदर दाखविणें । कर्म राजस बोलिजे ।२४।

दुसरियासी दु:ख करणें । क्षयो हिंसा धरणें । आणि आपणही दु:खी होणें । अज्ञाने करुनि कर्म करी ।२५।

फळ न कल्पी म्यां केलें म्हणोन । सिद्धि होय कीं नव्हे न म्हणे । आत्मा नेमिला धैर्यपणे । तो कर्ता सात्त्विक ।२६। अपेक्षुनी कर्मफळ इच्छी । लुब्ध हिंसात्मक अशुचि । संतोष सुख पावे सर्वेंचि । कर्ता राजस बोलिजे ।२७।

अयुक्त देहाभिमानी । नीच लटिकें अज्ञानी । रागीट आणि द्वेषी जाणोनी । कर्ता तामस बोलिजे ।२८।

बुद्धी धृतीचे गुण । त्रिविध भेद सांगेन । ते वेगळे करून । ऐक धनंजया ।२९।

प्रवृत्ति आणि कार्य । अकार्य भय अभय । जाणें बद्ध मोक्षाचें धैर्य । पार्था ते बुद्धि सात्त्विक ।३०।

जो धर्मा धर्म नेणें । कार्या कार्य न जाणें । ऐसे यथाविधी जो नेणें । ते बुद्धि राजस जाण ।३१।

अधर्म तो धर्म जाणे । सर्व अर्थासी विपरित म्हणे । सदाचारें असो नेणें । अर्जुना ते बुद्धि तामस ।३२।

धैर्य करुनिया मन । आणि इंद्रियें जाण । निश्चळ योगपण | हे धैर्य सात्विकाचें ।३३।

धर्म अर्थ आणि काम जाण । अर्जुना राखें धैर्य करून । फळाची आशा जो करी प्रसंगे करून । तें धैर्य जयाचें ।३४। निद्र शोक भये अति । विषाद आणि मदप्रीति । पोटींची दुर्बुद्धि नव्हे परती । ते धैर्य तामसाचें ।३५।

आता त्रिविध सुख । ते भारता तू ऐक । योगाभ्यासें पावे तो दु:ख । जाउनी उत्तम गतितें पावती ।३६।

पहिला आरंभ विषाचे परी । परिणामीं अमृत होय अवधारी । निर्मळ आत्मबुद्धीने करी । तें सुख सात्त्विक जाण ।३७।

विषयेंद्रिय संगे । जे भागभोगी त्रिविध योगें । परिणामी होय विषवेगें । ते सुख राजसाचें ।३८।

आरंभ दावी बद्धमोक्षाचे परि । परिणामीं तोचि पदार्थ विचारी । निद्र आळस अज्ञान धरी । तें सुख तामस ।३९। तो पृथ्वीवरी पांही । स्वर्गीं अथवा देवाचे ठायीं । प्राणि त्रिगुणाविरहित नाहीं । सत्य जाण पार्था ।४०।

ब्राह्मण क्षत्रिय वैश्य जाण । चौथा वर्ण शुद्र असोन । याचीं कर्मे वेगळी जाण । परि उपजती त्रिगुणीं ।४१।

शम दम तप आचार । शुचि शांति अर्जुनपर । ज्ञान विज्ञान आस्तिकीं स्थिर । हें कर्म ब्राह्मणाचें ।४२।

शौर्य तेज धृति दक्षपणें । संग्रामी पाठी नाहीं देणें । दान आणि समर्थपण । हें कर्म क्षत्रियांचे ।४३।

कृषि गोरक्ष वाणिज्य । हे वैश्यकर्म स्वभावजम् । शुद्रासी सेवा कर्म सहज । उदरपूर्ति कारणे ।४४।

आपुले कर्मी वर्तत । ते नर सिद्धिते पावत । आपुल्या कर्मी सिद्धि होत । ऐसें तें ऐक पां ।४५।

स्वकर्म जगत्राचि प्रवृत्ति । तेणें सर्व बांधले असती । म्हणोनि स्वकर्म आरंभिता पावती । सिद्धि देखा ।४६। स्वधर्म आपुला हीण परि तो कल्याण । परधर्मा परिस उत्तम जाण । आपुलें स्वधर्म कर्म आचरण । येणें पावन हें निश्चित ।४७।

म्हणोनि सहज कर्म गा अर्जुना । दोषरूप म्हणोनि न द्यावें टाकून । परि सर्व कर्में नाहीं दोषेविण । अग्नी तेथे धुम्र असे ।४८।

सर्वत्र बुद्धी आसक्त करोनी । निस्पृह वर्ते आत्मा जिंकोनी । तयासी कर्मेचि परम सिद्धि होउनी । संन्यासरूप फळ पावे ।४९।

जैसें ब्रह्म तें त्रिशुद्धि पावती । ते अर्जुना सांगेन तुजप्रति । तया ज्ञानाची प्रतीति । साक्षेपें करितां होय ।५०।

बुद्धी ज्ञान विषयाचि युक्ती । अभ्यासें आत्मा नेमिती । शब्दादि विषय त्यातें त्यजिती । रागद्वेषासहित ।५१। निस्पृह स्थळ सेउनी । लघु आहार करुनि । काया वाचा नेमुनि । नित्य असावें योगध्यानीं । वैराग्य न सोडिजे ।५२।

अहंकार बळ दर्प क्रोधातें । परिग्रह सांडुनि होईजे निर्मळ शांत । जे ब्रह्म व्हावया इच्छित । ते करिती या साधनासी ।५३।

अप्रसन्न जालिया ब्रह्म होती । शोक आणि आशा टाकिती । जे सर्व भूतीं सम असती । ते भक्त प्रेमा पावती निश्चित् ।५४।

भक्त मज जे पावती । जे ऐसी आहे माझी स्थिती । जे आत्म तत्त्व जाणती । ते प्रवेशती तयामध्यें ।५५।

सर्व कर्म आचरोनी ऐसें । माझ्या आश्रयीं मन वसे । ताया माझा प्रसाद असे । तो परम पद शाश्वत पावे अव्यय ।५६।

कर्मे निपजतील जी जाण । मनो भावे करी मदर्पण । बुद्धि योगाश्रित होऊन । मत्पदीं ठेवी चित्त सदा ।५७। माझ्याठायीं चित्त ठेविसी । तरी माझे प्रसादें सर्व दु:ख तरसी । अहंकार धरूनि करिसी । तरी सर्व दु:खे होती तुज ।५८।

मनी अहंकार धरूनी । युद्ध न करी ऐसें म्हणसी झणी । तया उद्वेगाचि होईल हानी । प्रवृत्ति युद्ध करवील तुज ।५९।

अर्जुना तू स्वभावें कर्में बांधलासी । अज्ञानें करूनि युद्ध न करी म्हणसी । तरी युद्ध कर्म अवश्य करी यासी । संदेह नाही ।६०।

सर्व भूतीं ईश्वर । व्यापुनी असे निरंतर । खेळवितसे व्यवहार । माया तंत्राचेनि सूत्रें ।६१।

अर्जुना सर्व भावें करूनी । शरण ये मजलागुनी । माझा प्रसाद घेउनी । शांती आणि स्थान पावसी शाश्वत ।६२। हें ज्ञान अंतरयामीचें गुह्यांतर । अर्जुना तुज सांगितले साचार । तयाचा करी विचार । नाइकसी तरी इच्छा तुझी ।६३।

सर्व गुह्य उत्तम जाण । ऐक मी तुज सांगेन । तू माझा सखा म्हणोन । तुझे हित सांगतसें ।६४।

मन ठेवी माझी भक्ति करी । मज यजी नमस्कारी । मज पावसी निर्धारी । हे प्रतिज्ञा माझी ।६५।

सर्व धर्म त्यजुनि । मज एका शरण येउनी । मी सर्व तुज पापापासुनी । मुक्ति देईन शोक न करी ।६६।

ज्ञान तप अनुष्ठान न करी । आणि माझी भक्ति नाहीं अंतरीं । सेवा न करी आणि द्वेष शरीरीं । तयासी हें ज्ञान सांगो नको ।६७।

हें परम गुह्य पावन । जो माझ्या भक्ता उपदेशी जाण । माझी भक्ति परम ऐकोन । तो मज पावे संदेह नाही ।६८। हे मनुष्यामाजी सांगितलें जो करी । तोचि माझे

ठायीं प्रीती  धरी । त्याहुनि मज आणिक नावडे पृथ्वीवरी । सत्य जाण अर्जुना ।६९।

हा धर्म कारण संवाद । जो नित्य करी सांडूनि भेद । तो ज्ञानयज्ञ त्यजुनी पावे परमपद । हे माझी बुद्धि निश्चित जाण ।७०।

भक्तियुक्त जो होउनि । आदरे करूनी ऐकें श्रवणीं । तो उत्तम लोकांते पावोनी । मुक्त होय सत्य जाण ।७१।

अर्जुना म्यां तुज सांगितले । तें तुवां एकाग्र ऐकिलें । तुझें अज्ञान मोह आहे कीं नाशिलें । तें सांग धनंजया ।७२।

**अर्जुन उवाच :**

गेला मोह म्हणे पार्थ। तुमचे नि प्रसादे जालो सावचित्त। संदेह फिटला निभ्रांत। करीन वचन स्वामी तुझें।७३।

**संजय उवाच :**

वासुदेव आणि पार्थाचा संवाद। कर्णी म्यां ऐकिला विनोद। तेणें रोमांच उभें राहोनीं जाला स्वानंद। तो राया काय सांगो।७४।

वेद व्यासांचेनि प्रसादें । परमगुह्य मी अनुवादें । योगेश्वरें श्रीकृष्णें आनंदे । सखयाप्रति सांगितलें ।७५।

राया तें मज पुन:पुन्हां आठवत । जो संवाद महा अद्‌भुत । केशवार्जुना पुण्य पवित्र । तेणें मज संतोष होय क्षणक्षणा ।७६।

जंव जंव आठवे हरींचे रूप । तंव तंव विस्मय होय अद् भुत । तेणें मज सुख होय असंख्यात । पुन: पुन: काय सांगो ।७७।

धृतराष्ट्र म्हणे तुज एक पुसेन । तें सांग संजया मजलागून । जय कोणा होईल जाण । तें ऐकेन तुझेनि मुखें ।।

जेथें श्रीकृष्ण योगेश्वरू ।दुसरा असे पार्थ धनुर्धरू । तेथे श्री आणि विजयाचा पडिभारू । हे दोन्ही अचळ असती ॥ अगाध परमात्मयाचि करणीं । सकळ शास्त्रें मंथन करूनी । गीता नवनीत काढुनी । धनंजयासी दिधलें ॥

तेणें किरिटिसी बोध जाला । परब्रह्मी मिळणीं मिळाला । आणि सकळही लोकां मार्ग सांपडला । भवसागर तरावया ॥

अर्जुना जालें समाधान । भगवंत कृपेंकरून । गेलें अज्ञान अंधपण । दिव्य प्रकाश जाला ॥

यालागीं महानुभाव महाॠषि । तत्पर गीता अभ्यासी । तेणें ते पावेल नेमेसी । अविनाशपद ॥

श्री सोपानदेवी

ऐसा कृपाळू देवादिदेवो । जड जीव तारावया केला उपावो । कळल्या गीतेचा गर्भ भावो । पुनरावृत्ति नाहीं ॥ शुद्धाशुद्ध तरी कोणी । करावी गीतेची घोकणी । तेणें संतोषें चक्रपाणी । कर्म बंधनें तोडील ।७८।

इति श्री मदभगवतगीतासूपनिषत्सु ब्रह्मविध्यायां योगशास्त्र श्रीकृष्णार्जुनसंवादे मोक्षसंन्यासयोगो नाम अष्टदशोऽध्याय: ॥१८॥

श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी पुस्तक वाचायला कुठे जायची गरज नाही. तुमच्या मोबाईलवर आता हजार मराठी ई पुस्तके आहेत.

मराठी ई पुस्तकं तुम्ही www. esahity. com वरून डाऊनलोड करा.

किंवा esahity@gmail.com ला कळवून मेल ने मिळवा. किंवा

7710980841 हा नंबर सेव्ह करून या नंबर ला तुमचे नांव व गांव

Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. किंवा ई साहित्यचे app.

https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity.

श्री सोपानदेवी

www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. ते download करा. हे सर्व मोफ़त आहे. No terms. No Conditions.

आता ठरवलंय. मराठी पुस्तकांनी अवघं विश्व व्यापून टाकू. प्रत्येक मराठी सुशिक्षिताच्या मोबाईलमध्ये किमान पन्नास मराठी पुस्तकं असलीच पाहिजेत. प्रत्येक मराठी माणसाच्या!

तुमची साथ असेल तर सहज शक्य आहे हे... कृपया जास्तीत जास्त लोकांना यात सामिल करून घ्या.

श्री सोपानदेवी

आपले नम्र

टीम ई साहित्य